संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहमदनगर, शनिवार दि. २८.१२.२०२४ अंक नं. २५२ वर्ष ६७ वे दैनिक वर्ष ६१ वे ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090





## संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ बीडमध्ये सर्वपक्षीय विराट आक्रोश मोर्चा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ शनिवारी (दि. २८) बीड शहरात सर्वपक्षीय विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात देशमुख हत्येतील आरोपी वाल्मिक कराडला अटक करा, त्याला अभय देणाऱ्या धनंजय मुंडे यांचे मंत्रीपद काढून घ्या, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. या मोर्चात संघर्षयोद्धा मनोज जरांगे, छत्रपती संभाजीराजे यांच्यासह बीड जिल्ह्यासह राज्यभरातील सर्वपक्षीय आमदार सहभागी झाले होते.

भावपूर्ण श्रद्धांजली!



कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की,
कै. विनोद विठ्ठलराव ताठे
स्वर्गवास दि. २०/१२/२०२४
इथे तु तिथे तु... दिसतो दिशादिशात तू... सर्व नाती आज हळहळली...
प्रत्येकाच्या आसवांत तू... निसर्गाने जरी हिरावली
✻ दशक्रिया विधी ✻
रविवार दि. २९/१२/२०२४ रोजी सकाळी ८.३० वा.
ठिकाण : अमरधाम, नालेगांव, नेप्तीनाका, अ.नगर. येथे होईल.
✻ दु:खांकित ✻
श्रीमती सोनाली विनोद ताठे (पत्नी) सई विनोद ताठे (मुलगी)
शिवांश विनोद ताठे (मुलगा) अनन्या विनोद ताठे
स्वाती विश्वास फुलारी
समस्त ताठे, बेलेकर परिवार
जे.एस. इंजिनिअरिंग वर्क्स, एल ११९, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर
अर्पित इंजिनिअरिंग वर्क्स, एल १२०, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर

सुरक्षा तुमची सर्व्हिस आमची
CCTV Camera Set 9999/-
नियम व अटी लागु*
घर, दुकाने, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज
गोल्डन एंटरप्रायजेस
दिल्लीगेट, अहिल्यानगर
7304099919

दररोज गरम नाष्टा – आता चाणक्य चौकात सुद्धा...
इमरती, फाफडा, कांदा कचोरी, कोथंबीर वडी, समोसा, ढोकळा.
म्हशीच्या दुधा पासून बनविलेली सकस, बासुंदी, मलई बर्फी, सिताफळ रबडी.
बम्बईवाला Since 1910
मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट । दिल्ली चाट । फास्टफुड
कापड बाजार, अ.नगर. | चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

भावपूर्ण श्रद्धांजली!



ना ध्यानी ना मनी
तुम्ही गेलास आम्हास सोडूनी
येते डोळ्यात निरंतर पाणी
उणीव तुमची भासे क्षणोक्षणी
✻ दशक्रिया विधी ✻
कै. विनोद विठ्ठलराव ताठे
रविवार दि. २९/१२/२०२४ रोजी सकाळी ८.३० वा.
ठिकाण : अमरधाम, नालेगांव, नेप्तीनाका, अ.नगर. येथे होईल.
✻ दु:खांकित ✻
मच्छिंद्र रामभाऊ ताठे । राजेंद्र रामभाऊ ताठे । विनायक विठ्ठलराव ताठे
सचिन विठ्ठलराव ताठे । गणेश लक्ष्मणराव ताठे । नितीन लक्ष्मणराव ताठे
रविंद्र सखाराम मेहेत्रे (दाजी) । चि. शिवांश विनोद ताठे (मुलगा)
समस्त ताठे परिवार

श्री भैरवनाथ यात्रा कंपनी आयोजित
मु. पो. चिंभळे, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर.
स्पेशल नेपाळसह प्रयागराज कुंभमेळा. जगन्नाथ पुरी. गंगा सागर एकधाम यात्रा.
प्रस्थान दि. १०/२/२०२५ प्रवास १८ दिवसांचा राहील
यात्रेतील प्रसिध्द ठिकाणे. उज्जैन.काशी. आयोध्या.गोरखपूर. नेपाळ पशुपतीनाथ.जनकपुर. गया. कोलकाता कालिकामाता मंदिर. हावडा ब्रीज. गंगासागर. ओडिसा भुवनेश्वर मंदिर. कोणार्क सुर्य मंदिर. जगन्नाथ पुरी धाम. व इतर बरेच काही.
प्रवास स्लीपर कोच लक्झरी बस ने केला जाईल. चहा.नाश्ता. दोन वेळ जेवण व शेरींग रूम मधे मुक्काम वेवस्था केली जाईल.
अधिक माहिती साठी संपर्क
सुरजित शिरोळे
मो. 7757810981 / 9284658430
बस निघण्याचे ठिकाण :- हॉटेल इंद्रायणी औरंगाबाद रोड अहील्यानगर



प्रत्येक नळाला भरपूर पाणी
Crompton, Texmo, Havells Pump
✻ घरगुती तसेच शेतीचे दर्जेदार पंप उपलब्ध..
✻ एकदा अवश्य भेट द्या!
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधांयुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
आयोजित
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी, कान, नाक, घसा
मोफत सर्व रोग तपासणी शिबीर
सकाळी १० ते ५ वा. (रविवार सोडुन)
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री सहाय्यता निधी
✻ मोफत ॲन्जीओप्लास्टी
✻ माफत डायलेसीस/किडनी विकार
✻ माफत कर्करोग शस्त्रक्रिया
✻ मोफत नवजात अतिदक्षता विभाग
✻ मोफत अपघात व पॉली ट्रॉमा फ्रॅक्चर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध
मोफत साखर तपासणी
२४ तास अत्यावश्यक व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध
ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनेग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, २डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, वंधत्व निवारण व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
✻ शिबीरस्थळ ✻
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
फोन : 0241-2423336,
मो. 9130423336, 9860310001
टिप : नांव नोंदणी आवश्यक
मोफत ओ.पी.डी.

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA | KERAKOLL | CARYSIL | colortile | RAK CERAMICS | NIRALI | TIMEX | ICON

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## शब्द-शब्द जपून ठेव...

शब्द तरी काय आहे? पंचेंद्रियांनी ग्रहण करता येण्याजोगं काहीतरी, जे अव्यक्ताला व्यक्त करू पाहातं आहे. कसे उत्पन्न झाले असतील शब्द? प्रकाश, गमन, स्पर्श, शीतोष्ण, वेग, बलप्रयोग वगैरे अत्यंत थोड्या प्रमाणात असलेले प्राथमिक भाव निवेदन करण्यासाठी सुरुवातीला उपयोगात आणले गेले असतील.

पुढे जसजशी भाषेची प्रगती होत गेली तशी क्रमाक्रमानं त्यात भावांची विविधता, निश्चितता वाढीला लागली असेल. त्यासाठी अस्पष्टतेतून निश्चित असे निश्चलत्त्व भौतिक अंशामधून, मानसिक अंशामध्ये, व्यक्तातून अव्यक्त भावना अशा पद्धतीनं भाषेची वृद्धी झाली असावी.




अव्यक्त भावना व्यक्त करण्यासाठी शब्दाची निर्मिती व विकास होऊन काव्य, ग्रंथे, साहित्य विकसित झाली.

शब्द शब्द जपून ठेव, शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले...

शब्दांच्या माध्यमातूनही अनेक सहृदय जुळतात. प्रेमभावना अंकुरतात, जीवनाच्या विविध स्पर्शी आनंदाची अनुभूती घेता येते.



म्हणूनच शब्द भांडार वाढवल्यास जीवनात खरी संपत्ती लाभून ती लुटताही येऊ शकते.

# पैशांच्या वादात मध्यस्थी करायला गेलेल्या इसमावर कोयत्याने हल्ला

## वारुळाचा मारुती परिसरातील घटना, तिघांवर गुन्हा दाखल

नगर - आमच्या पैशाच्या वादात तू मध्यस्थी करु नकोस. असे म्हणून शिवीगाळ करून एकावर कोयत्याने वार केल्याची घटना नालेगाव परिसरातील वारुळाचा मारुती जवळ घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अरुण रखमाजी कदम (वय ३९, रा.वारुळाचा मारुती जवळ, नालेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी कदम २४ डिसेंबर रोजी रात्री ७.३० च्या सुमारास त्यांच्या घराजवळ असताना गणेश उर्फ बजरंग बाबाजी चितळे हा त्यांच्याकडे, विशाल कदम याने मला मारले असे ओरडत पळत आला. तेव्हा अरुण कदम हे गणेश चितळे यास घेऊन विशाल कदम कडे गेले. व तुम्ही गणेश चितळे यासोबत का भांडता असे विचारले असता विशाल कदम याने आमच्यात पैशाचा वाद आहे. तू मध्ये पडू नकोस असे बोलला. त्यावेळेस अरुण कदम यांनी विशाल कदम व गणेश चितळे यांच्यासोबत असलेल्या पैशाच्या वादाबाबत भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. याचा राग येऊन विशाल कदम याने त्याच्या दोन साथीदारांना फोन करून बोलावून घेतले. त्या वेळेस ते दोघे तेथे मोटरसायकल वरून आले. त्या दोन अनोळखी साथीदारांनी येऊन शिवीगाळ, दमदाटी करीत कोण विशाल कदमला नडतो असे बोलून त्यातील एकाने गाडीचे डिक्कीतून कोयता काढून अरुण कदम यांच्या खांद्यावर व उजव्या हातावर वार केले. या त्यामुळे त्यांच्या खांद्यातून रक्त येऊ लागले. त्यावेळी मोटारसायकल वरून आलेले दोघे तिथून पळून गेले. त्यावेळी विशाल कदम ही तेथून निघून गेला.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी अरुण कदम यांनी दिलेले फिर्यादीवरून विशाल कदम व त्याचे सोबत असलेले दोन अनोळखी इसमांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पुणे ते अहिल्यानगर, शिर्डी ते पुणतांबा, शिर्डी ते नाशिक तीन नवीन रेल्वे मार्गांच्या सर्वेक्षणास केंद्राची मान्यता

## मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी मानले रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार

नगर - नगर जिल्ह्यातील बहुप्रतिक्षित पुणे ते अहिल्यानगर, साईनगर शिर्डी ते पुणतांबा आणि साईनगर शिर्डी ते नाशिक या थेट रेल्वे मार्गांच्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्यता दिली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या मागणीवरून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नगर जिल्ह्यातील जनतेला ही मोठी भेट दिली आहे. या मार्गासाठी समितीच्या बैठकीत वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून या नवीन रेल्वे मार्गांमुळे नगरच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल तसेच शेतकऱ्यांनाही शेतीमाल जलद गतीने बाहेर पाठवता येणार असल्याने ग्रामीण विकासालाही चालना मिळेल, अशी माहिती मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी दिली.

नगर शहर-पुणे-नाशिक दरम्यानची रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी २४८ किमी लांबीच्या दौंड-मनमाड मार्गाच्या दुहेरीकरणास मान्यता देण्यात आली आहे. एकूण २४८ कि.मी.पैकी १७८ कि.मी.चे काम पूर्ण झाले असून उर्वरित ७० कि.मी.चे काम प्रगतीपथावर आहे. याशिवाय तीन नवीन दुहेरी रेल्वे मार्गांना केंद्राने मंजुरी दिली आहे.

नाशिक - साईनगर शिर्डी (८२ कि.मी.), पुणे - अहमदनगर (१२५ कि.मी.) दरम्यान नवीन दुहेरी ट्रॅक आणि साईनगर शिर्डी - पुणतांबा (१७ कि.मी.) दरम्यान नवीन दुहेरी ट्रॅक अशा तीन रेल्वे प्रकल्पांसाठी सर्वेक्षणास मान्यता देण्यात आली आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर डीपीआर तयार केला जाईल. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत एका अतारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, पुणे आणि नाशिक यांच्या थेट जोडणीसाठी डीपीआर महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळाने तयार केला आहे. हा महाराष्ट्र सरकार (५० टक्के) आणि रेल्वे मंत्रालय (५० टक्के) यांचा संयुक्त उपक्रम आहे. डीपीआरमधील प्रस्तावित संरेखन नारायणगावमधून जाते जेथे नॅशनल सेंटर फॉर रेडिओ स्ट्रोफिजिक्स, पुणे यांनी जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप वेधशाळा स्थापन केली आहे. जीएमआरटीमध्ये ३१ देशांमधील (२८ व्या चक्रापर्यंत) वापरकर्ते आहेत जे वैज्ञानिक निरीक्षणांसाठी त्यांच्या सेवा वापरतात. जीएमआरटी वेधशाळेच्या कामकाजावर प्रस्तावित रेल्वे मार्गाचा विपरीत परिणाम झाल्यामुळे हे संरेखन स्वीकार्य आढळले नाही. त्यामुळे आता हा प्रश्न सोडवण्यासाठी रेल्वेने डीपीआर तयार करण्याचे काम सुरू केले आहे.

रेल्वे प्रकल्पांना मान्यता देणे ही भारतीय रेल्वेची निरंतर आणि गतिमान प्रक्रिया आहे. रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये मोबदला, रहदारीचा अंदाज, शेवटच्या मैलाची जोडणी, गहाळ दुवे आणि पर्यायी मार्ग, गर्दीच्या/संतृप्त मार्गांचा विस्तार हे सामाजिक-आर्थिक विचारांच्या आधारावर सुरू केले जातात. या तिन्ही रेल्वे योजनांच्या सर्वेक्षणाला मंजुरी दिल्याबद्दल राधाकृष्ण विखे पाटील, डॉ.सुजय विखे पाटील, मध्य रेल्वे समितीचे सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहेत.

यामुळे नगर - पुणे, नगर - नाशिक नवीन रेल्वे मार्गाने जोडला जाईल. यामुळे नगरच्या विकासाला फार गती मिळेल असा विश्वास सुदर्शन डुंगरवाल यांनी व्यक्त केला आहे.

# इमारत बांधकामावरून पाय घसरून पडल्याने कामगाराचा मृत्यू

नगर - इमारतीच्या सुरु असलेल्या बांधकामावर काम करत असताना पाय घसरून खाली पडल्याने गंभीर जखमी होवून कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.२७) दुपारी नगर शहरातील सक्कर चौक परिसरात घडली.

जितेंद्र भगत (वय ४३, मूळ रा. बिहार) असे मयत कामगाराचे नाव आहे. सक्कर चौक परिसरात गुंजाळ हॉस्पिटल जवळ एका इमारतीचे बांधकाम सुरु असून मयत भगत व इतर कामगार तेथे काम करत होते. शुक्रवारी दुपारी भगत हा पाय घसरून इमारतीवरून खाली पडला. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला त्याचा सहकारी दीपक साने याने दुपारी १ च्या सुमारास उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.खेडकर यांनी उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या खबरेवरून कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# थायलंड येथील प्रमुख भन्ते अजहन जयासारो २९ डिसेंबर रोजी उपासकांना धम्मदेशना देणार

नगर- भन्ते धम्मदेसना देण्यासाठी २९ डिसेंबर रोजी थायलंड या बौद्ध देशातुन भिखू संघ पंचशील प्रतिष्ठान बुद्ध विहार, मोतीनगर, केडगाव, अहिल्यानगर येथे सकाळी ९:३० वा.येणार आहे.

त्यांच्या स्वागतासाठी आणि कार्यक्रमसाठी शहरातील सर्व धम्म बंधू भगिनी, विविध सामाजिक संघटना, बुधिष्ट धार्मिक संघटना यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सभासद तसेच सर्व पालकांनी प्राथमीक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींना, शुभ्र पांढरे वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पंचशील प्रतिष्ठान अहमदनगर यांच्यावतीने करण्यात आले.

यावेळी उपस्थित राहणाऱ्या सर्व उपासकांसाठी सहभोजन भोजनाचे आयोजन करण्यात आलेला आहे. यावेळी भन्ते अजहन जयासारो, थायलंड प्रमुख भन्ते, थाई फॉरेस्ट ट्रेडिशन, थायलंड हे धम्मदेसना देणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून हर्षदीपजी कांबळे, (IAS) महाव्यवस्थापक, बेस्ट, महाराष्ट्र शासन, मुंबई, व आर. के. गायकवाड (IAS Rtd) मा. कमिनशर, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आदी उपस्थित राहणार आहेत.

# केडगाव-दौंड रोड रेल्वे भुयारी मार्गाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात यावे

## माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे शहराध्यक्ष वैभव कदम यांची निवेदनाद्वारे मागणी

नगर- केडगाव मधून दौंड रोडला जोडणाऱ्या रेल्वे भुयारी मार्गाचे काम गेल्या १ महिन्यापासून सुरू आहे. परंतु सदरचे काम हे अत्यंत धिम्या व संथ गतीने सुरू असून याच पद्धतीने काम सुरू राहिल्यास पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. सदरचे काम हे पावसाळ्यापूर्वी पूर्ण झाल्यास केडगाव भागातील शास्त्रीनगर,समतानगर, मोहिनीनगर व इतर भागातील नागरिकांना दळणवळणासाठी नगर शहर हे अत्यंत जवळ होणार आहे.

त्यामुळे हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. कारण पावसाळ्यामध्ये केडगाव भागातील नागरिकांना दौंड रोडला जाण्यासाठी अत्यंत खराब व चिखलमय रस्त्यातून प्रवास करावा लागतो. त्यामुळेच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे शहराध्यक्ष वैभव कदम यांनी सदरचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत संबंधितांना आदेश देण्याची मागणी केंद्रीय रेल्वे प्रशासनाचे डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर,पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# भिंगारमध्ये लष्करात कार्यरत इसमाची गळफास घेत आत्महत्या

नगर - भिंगार परिसरात लष्करी वसाहतीत क्लर्क म्हणून कार्यरत असलेल्या इसमाने त्याच्या बराकीत गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि.२७) दुपारी उघडकीस आली. पुरुषोत्तम परिमल (वय ५१, रा. एसी रेकॉर्ड कॉर्नर, मिलिटरी विभाग, भिंगार) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे.

मयत परिमल हे लष्करी विभागात क्लर्क म्हणून कार्यरत होते. त्यांचे कुटुंबीय गावाकडे राहात होते व परिमल हे एकटेच बराकीत राहायचे. शुक्रवारी दुपारी १२.२७ वाजण्याच्या सुमारास त्यांनी बराकीत गळफास घेतल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यांचे सहकारी अजबसिंग यादव यांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.खेडकर यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

याबाबतच्या खबरेवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पुढील तपास पो.हे.कॉ. महेश विधाते हे करीत आहेत.

# भिंगारमधील मंजुर सर्व रस्त्यांची कामे सुरु करा अन्यथा बांधकाम कार्यालयात 'ठिय्या आंदोलन'

नगर - भिंगार शहरातील अंतर्गत रस्त्यांसाठी विशेष विकास निधीतून तत्कालीन खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नांतून तब्बल दोन कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी मिळाली. त्या सर्व कामांना वर्कऑर्डरही मिळाली. ती सर्व रस्त्यांची कामे, सुरु न झाल्यास अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा सा.बां. मुख्य अभियंता यांना दिलेल्या निवेदनात कॅन्टोन्मेंट बोर्ड मानद सदस्य वसंतराव राठोड यांनी दिला आहे.


वसंतराव राठोड

निवेदनात श्री. राठोड यांनी म्हटले की, सुजय विखे पाटील यांच्या विकासनिधी अंतर्गत भिंगार शहरातील रस्त्यासाठी सुमारे दोन कोटी निधी मंजूर होऊन, त्या रस्त्यांच्या कामांची टेंडर प्रक्रिया तसेच वर्कऑर्डर पर्यंतची प्रशासकीय प्रक्रिया झाली आहे. याबाबत एक वर्षापूर्वीच सा.बां. अधिकाऱ्यांनी सांगितले होते. परंतु आजपर्यंत प्रत्यक्षात कामे का झाली नाही? यांची संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसून, फक्त उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. तसेच संबंधित अधिकारी त्याला राजकीय रंग देत टाळाटाळ करीत आहेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी भिंगार शहरातील रस्त्यांची तातडीने कामे सुरु न केल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात, येईल, असा इशारा दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, डॉ. सुजय विखे पाटील, ना. राधाकृष्ण विखे पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री, अन्य कॅबिनेट मंत्री, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# पतंग पकडण्यासाठी पळताना दोन मुलांचा विहिरीत पडून मृत्यू

नगर - पतंग पकडण्यासाठी पळत असताना दोन मुलांचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नगर तालुक्यातील पोखर्डी शिवारात शुक्रवारी (दि.२७) सायंकाळी ही घटना घडली. अनिकेत रत्नदीप आल्हाट (वय १३) व दिनेश विशाल देठे (वय ९, दोघे रा. पोखर्डी, ता.नगर)) अशी मृतांची नावे आहेत.

पोखर्डी गावाजवळच चंद्रकांत सुंदर देठे यांची शेत असून त्या ठिकाणी विहीर आहे. शाळेला सुट्या असल्याने काही मुले शुक्रवारी सायंकाळी देठे यांच्या विहिरीपासून जवळच पतंग उडवत होती. त्यातील एक पतंग कटल्याने तो पकडण्यासाठी अनिकेत व दिनेश पतंगाच्या दिशेने पळत सुटले व ते दोघे विहिरीत पडले.

त्यांच्यासोबत असलेल्या इतर मुलांच्या ही घटना लक्षात आली. त्यांनी आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिक त्या ठिकाणी जमा झाले. एमआयडीसी पोलिसांना माहिती मिळताच सहायक निरीक्षक माणिक चौधरी यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी दोन्ही मुलांना विहिरीतून तातडीने बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी दोघांचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# अनेक वेळा निवेदन देऊनही कारवाई होत नसल्याने महापालिका कार्यालयावर गाढवाचा मोर्चा काढणार

## प्लॉटमध्ये झालेले अतिक्रमण काढून लहान मुलांसाठी बगीचा व महापुरुषांचे पुतळे बसवा

नगर - नागापूर रेणुकानगर येथील ॲमिनिटी जागा महानगरपालिकेच्या मालकीची असून त्यामध्ये खाजगी व्यक्तींकडून अतिक्रमण झालेले आहे. ते काढून सदरील ॲमिनिटी प्लॉटचे सुशोभीकरण करून तेथे लहान मुलांसाठी बगीचा करून महापुरुषांचे पुतळे बसवण्यात यावे या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली. यावेळी फाउंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, साहेबराव काते, कर्मा वावरे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.



निवेदन देऊनही कारवाई होत नसल्याने महापालिका कार्यालयावर गाढवाचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा महापालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मौजे नागापूर येथील रेणुकानगर येथे महापालिकेच्या मालकीची ॲमिनिटी जागा आहे. सदरील ॲमिनिटी प्लॉट काकासाहेब म्हस्के कॉलेज रोड आंबेडकर चौक सनफार्मा शाळेजवळ आहे. तरी सदर ॲमिनिटीमध्ये खाजगी व्यक्तींनी अतिक्रमण करून गाळे काढलेले आहे. त्यामुळे पालिकेने जागा खाली करून तिथे शाळेतील व परिसरातील लहान मुलांसाठी व नागरिकांसाठी बगीचा तयार करण्यात यावा व महापुरुष साहित्यरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांचे पुतळे बसविण्यात यावे अन्यथा महापालिकेवर गाढवाचा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# प्रेमदान चौकात फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर - नगर मनमाड रोडवरील प्रेमदान चौकातील अनभूले हॉस्पिटल जवळील रस्त्याच्या कडेला असलेल्या लाईटच्या खांबावर नाताळ व नववर्षाच्या शुभेच्छा असलेले फ्लेक्स बोर्ड विनापरवाना लावल्या प्रकरणी महानगर पालिकेने अज्ञात व्यक्ती विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबतची माहिती अशी की महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक एक चे प्रभाग अधिकारी बबन लक्ष्मण काळे, अतिक्रमण विभागातील आदित्य बल्लाळ, अतिक्रमण विभाग प्रमुख राहुल दत्तात्रय साबळे असे, वरिष्ठांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका अन्वये विनापरवाना अनधिकृतपणे फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याकरिता महापालिका हद्दीत पाहणी करीत असताना प्रेमदान चौक येथील अनभूले हॉस्पिटल जवळील लाईटच्या खांबावर नाताळ व नववर्षाच्या शुभेच्छा फलक लावलेला दिसला. या फलकावर जानू भाऊ भिंगारदिवे व दोस्ती ॲम्बुलन्स अ.नगर असे लिहिलेले होते.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात प्रभाग अधिकारी बबन काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र मालमत्तेच्या विद्रूपीकरण प्रतिबंधक अधिनियम १९९५ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सौ. सविता फल्ले यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पाटील वस्ती, भिंगार येथील रहिवासी सौ. सविता कृष्णा फल्ले (वय ६५) यांचे २४ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साई सप्लायर्सचे संचालक रवि फल्ले व निलेश फल्ले यांच्या मातोश्री होत.

# घर फोडून दागिने व रोकड चोरट्यांनी पळविली

नगर - वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्याचे घर अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी फोडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा सुमारे २ लाख २७ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील राळेगण म्हसोबा शिवारातील धनगरवाडी येथे गुरुवारी (दि.२६) रात्री ९ ते शुक्रवारी (दि.२७) पहाटे ४ या वेळात घडली.

याबाबत पदु नामदेव भिसे (रा. धनगरवाडी, राळेगण म्हसोबा, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी भिसे व कुटुंबीय गुरुवारी रात्री घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी कोयंडा उचकटून आत प्रवेश केला. घरातील साहित्याची उचकापाचक करत कपाटात ठेवलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा सुमारे २ लाख २७ हजारांचा ऐवज चोरून नेला. पहाटे झोपेतून उठल्यावर फिर्यादी भिसे यांना घरात चोरी झाल्याचे समजले. याबाबत त्यांनी नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. त्यानंतर भिसे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला.

## दुचाकीची चोरी

नगर - घरासमोरील पार्किंग-मध्ये लॉक करून लावलेली रॉयल इन्फिल्ड कंपनीची बुलेट दुचाकी (क्र. एम एच १६ बी क्यू ०३००) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना सावेडी परिसरातील गावडे मळा येथे घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी विक्रम परशुराम मेहतानी (वय ४१, रा. गोकूळधाम अपार्टमेंट, गावडे मळा, पाईपलाईन रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.



## चिमुकल्यांची धमाल...

ज्ञानवर्धिनी बालक मंदिर मधील वार्षिक स्नेहसंमेलनात राजस्थानी नृत्यावर आपली कला सादर केली कुमारी पखुंडी गिराजे, महिमा वाळे, चि.आरुष नरसाळे, वक्रतुंड वाळकुळी आदींनी सर्वांची मने जिंकली (छाया - विजय मते)

# गृहिणी

## आरोग्य

### चांगल्या झोपेसाठी

झोपण्यापूर्वी एक तास आराम करा. एखादे पुस्तक वाचा, संगीत ऐका किंवा हलका व्यायाम करा. परंतु, टीव्ही किंवा मोबाईल फोन टाळा, कारण त्यांचा प्रकाश झोपेवर परिणाम करू शकतो. त्याचप्रमाणे दिवसा व्यायाम केल्याने झोपेची गुणवत्ता सुधारते.

## पाककला

### गाजराचे लोणचे

**साहित्य** : १ किलो गाजर, १ कप मोहरीचे तेल, १ चमचा तिखट, १/२ चमचा हळद, १ चमचा आमसूल पावडर, चवीनुसार मीठ

**कृती** : सर्वात आधी गाजर स्वच्छ धुवून सोलून घ्यावे व उभ्या आकारात छोटे छोटे त्याचे तुकडे करावे. आता मोहरीचे तेल तिखट, हळद, आमसूल पावडर, मीठ घालून बारीक वाटून द्यावे. आता एका कढईमध्ये तेल गरम करून घ्यावे गरम तेलात गाजराचे तुकडे घालून परतवून घ्यावे. आता हे तुकडे बनवलेल्या मिश्रणामध्ये चांगले मिक्स करावे. तसेच गाजराचे हे मिश्रण एका डब्ब्यात भरावे व झाकण लावून ठेवावे कमीत कमी एक आठवडा असेच ठेवावे ज्यामुळे ते चांगल्या प्रकारे मुरेल आणि त्याची चव चटपटीत लागेल.

## वास्तू

### उत्तम आरोग्यासंबंधी

औषधांचा संबंध रोगाशी आणि रोगाचा संबंध नकारात्मक उर्जेशी असतो. जेव्हा आपण औषधे आपल्याजवळ ठेवतो तेव्हा ही नकारात्मक ऊर्जा आपल्या आजूबाजूला पसरू शकते. त्यामुळे वास्तुशास्त्रानुसार चुकूनही औषधे खिशात ठेवू नयेत, अन्यथा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ लागतात.

## सल्ला

मळालेले पैशाचे पाकीट खिशात ठेवू नये अन्यथा दारिद्र्य येते.

## सौंदर्य

तुमची नखे सुंदर ठेवण्यासाठी तुम्ही आठवड्यातून एकदा तरी त्यांना ट्रिम करा. क्यूटिकल कापू नये कारण ते तुटल्यास नखे संक्रमित होऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २९ डिसेंबर २०२४

**शिवरात्रि, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, ज्येष्ठा २३।२२, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०६ वा. ०८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न कराल. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होतील. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : नवे परिचय सुद्धा लाभदायी होतील. जुनी मित्र भेटल्याने दिवस आनंदात जाईल.

**वृश्चिक** : मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा-वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. पितृचिंता सतावेल.

**मकर** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. वाहने बिघडण्याची शक्यता आहे. पाकीटमारी होईल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**मीन** : राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

वयाच्या सत्तराव्या वर्षी गणपतरावांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्या मुलाला विचारले, ''प्रॉपर्टीविषयी व कुटुंबियांच्या नंतरच्या व्यवस्थेविषयी त्यांनी काही सांगितले का?'' त्यांचा मुलगा म्हणाला, ''त्यांनी काहीच नाही सांगितले कारण आई शेवटपर्यंत त्यांच्या उशाला बसून होती''

# जागतिक आश्चर्ये


## सिचेन इतझा पिरॅमीड

शिचेन इतझा या पिरॅमीडचे वैशिष्ट्य असे ओह की त्यास सरळ उभ्या ९१ पायऱ्या आहेत (जिन्यासारख्या) त्याच्याभोवती मोकळे प्रशस्त मैदान व खूप खोल अशी विहीर असून बाजूने मोठे कंपाऊंड आहे.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०८१

सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७०८० चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| य | श | वं | त | रा | व | ■ | स्व |
| ■ | र | ग | ड | ■ | शि | क | स्त |
| अं | द | ण | ■ | कै | ला | स | ■ |
| बा | प | ■ | चा | क | ■ | दा | म |
| बा | वा | ■ | क | ■ | आ | र | सा |
| ई | र | ■ | र | सा | ■ | ■ | ला |
| ■ | ■ | स | मा | न | शी | ल | ■ |
| म | न | मा | नी | ■ | त | ड | क |

**आडवे शब्द :-** १) वागावे कसे याबद्दलची नियमावली ७) माळ; हार; बरोबरी; तुलना ८) रसभंग; मनोभंग ९) संकटसमयी येण्याविषयी केलेली प्रार्थना १०) पिकांवर पडणारा एक रोग; खवा ११) पुरुषाचे एक टोपणनाव; विविध १२) सुस्ती १३) सोंगटी; सारिका १५) घटिकेचा साठावा भाग; क्षण १६) शौर्याचे काव्य रचून ते गाणारा कलावंत १८) वायफळ; व्यर्थ १९) टाचा; शिवण; शरीराचा सांधा २१) नव्याने आलेला २३) अंतराळ; आकाशतत्त्व २४) हिचे मीठ अळणी असते असे म्हणतात

**उभे शब्द :-** १) इच्छा; आकांक्षा २) हैदराबादची प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तू ३) राज्य घटना ४) एक रंग ५) साठ मिनिटांचा काळ; घंटा ६) एका ठिकाणी बसणे उठणे १०) हार; डोंगराळ जमीन ११) बेकरीत तयार होणारा एक गोड पदार्थ १२) आरोप; बालंट १४) अवस्था; गत; स्थिती १५) परवानगीचे पत्र १७) हलक्या दर्जाचे; कमी दर्जाचे १८) लवकर न तुटणारा; लवचीक २०) या पदार्थामुळे विडा रंगतो २२) आटोका; हातांची वेंध; ताकत

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : आपण कोण आहोत यापेक्षा आपण कोणाच्या संगतीत आहोत हे महत्त्वाचे आहे.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## इंटरनेटचा शोध कोणी लावला?

इंटरनेटचा शोध एका दिवसात झाला नाही, तर तो विविध तंत्रज्ञानांच्या विकासाचा परिणाम आहे जो कालांतराने झाला. १९६० च्या दशकात, शीतयुद्धाच्या काळात, अमेरिकेच्या संरक्षण विभागाने एक संगणक नेटवर्किंग प्रकल्प सुरू केला ज्याचे नाव होते. याचा उद्देश वेगवेगळ्या स्थानांवर असलेल्या संगणकांना आपसात जोडणे आणि डेटा सामायिक करण्याची सुविधा प्रदान करणे होता, जेणेकरून अण्वस्त्र हल्ल्याच्या परिस्थितीत देखील संवाद साधणे शक्य होईल.

RPNET हा पहिला व्यावहारिक आणि कार्यरत संगणक नेटवर्क होता ज्याने पॅकेट स्विचिंग सिद्धांतावर काम केले. यामुळे डेटा लहान तुकड्यांमध्ये विभाजित करून वेगवेगळ्या मार्गांनी पाठवला जाऊ शकतो. १९६९ मध्ये RPNET ची पहिली कनेक्शन स्थापन केली गेली.

इंटरनेटचा विकास अनेक शास्त्रज्ञांच्या योगदानामुळे झाला, परंतु विन्ट सर्फ आणि बॉब कान यांनी टीसीपी/आयपी प्रोटोकॉलचे विकास केले, जे इंटरनेटचे आधारभूत संरचनात्मक प्रोटोकॉल बनले. TCP/IP प्रोटोकॉलची सुरुवात १ जानेवारी १९८३ रोजी RPNET प्रकल्पात केली गेली, ज्याला इंटरनेटच्या जन्माचा दिवस मानला जातो. १९८० च्या दशकात, इंटरनेटचा वापर अधिक व्यापक झाला, आणि अकादमिक आणि संशोधन संस्थांमध्ये त्याचा वापर वाढला. १९९० मध्ये, टिम बर्नर्स-ली ने वर्ल्ड वाइड वेब (WWW) चा शोध लावला, जो इंटरनेटवरील माहितीच्या संग्रहालयासारखा होता, आणि त्याने वेब पेजेसची निर्मिती आणि ब्राउझिंग सुलभ केले. वर्ल्ड वाइड वेबच्या विकासामुळे इंटरनेटचा वापर सर्वसामान्य लोकांसाठी शक्य झाला, आणि त्याचा वापर जगभरात वाढला. या प्रकारे, इंटरनेटचा शोध आणि विकास अनेक वर्षांच्या संशोधन आणि सहयोगाचा परिणाम आहे, ज्यामध्ये अनेक वैज्ञानिक आणि इंजिनीअर्सचे योगदान आहे.

## खरा भक्तीभाव

एकदा एका कावळ्याने सटवाईला काही वस्तू अर्पण करण्याचे ठरविले. त्यासाठी कुत्र्याला त्याने आपल्याबरोबर येण्याची विनंती केली.

कुत्रा म्हणाला, 'देवीला तुझा इतका कंटाळा आहे की, तू दिलेल्या वस्तूंचा ती मुळीच स्वीकार करणार नाही.'

यावर कावळा म्हणाला, 'अरे, यासाठीच तर मी तिला वस्तू भेट देण्याचं ठरविलं आहे. तिचा माझ्यावरचा रोष दूर व्हावा आणि तिनं माझं कल्याण करावं या हेतूनेच मी तिला या वस्तू अर्पण करणार आहे.'

तात्पर्य : खऱ्या भक्तीभावाने पूजा करणारे फारच कमी असतात.

# रहमते दर्शन (भाग - १)



जब परम संत हुज़ूर कृपालसिंह जी महाराज ने चोला छोड़ा तो एक असमंजस की स्थिति सत्संगियों के सामने पेश आई कि आगे रूहानियत का काम महाराज जी किस को सौंप कर गये ? उन्हीं दिनों कैथल में नया सत्संग घर बन रहा था। संगत सेवा में लगी हुई थी। मिट्टी डाल कर ज़मीन को बराबर किया जा रहा था। मैं भी वहाँ सेवा में रहता था। एक रात मैंने हुज़ूर से रो-रोकर विनती की कि आप ही हमें बतायें कि आगे का काम किसको सौंपा गया है। तभी एक

### सच्चा अधिकारी

चमत्कार हुआ और वहाँ पर एक बिछी हुई दरी के ऊपर संत दर्शनसिंह जी महाराज प्रकट हुए और बैठ गये। संगत सेवा में लगी हुई थी। मुझे आवाज़ आई कि रूहानियत का काम अब यही करेंगे। मैंने संत दर्शनसिंह जी की ओर देखा, उनके चेहरे पर प्रकाश ही प्रकाश था। मेरा मन नहीं माना और ख्याल आया कि इतनी रोशनी तो मैंने पहले कभी नहीं देखी थी और अपनी आँखें बंद कर लीं और सोचा कि अब दुबारा से देखता हूँ। आँखें खोली तो देखा कि महाराज जी के चेहरे पर रोशनी और तेज़ हो गई है। अब की बार मन ने फिर धोखा दिया और ख़्याल आया कि दर्शनसिंह कैसे गुरु गद्दी सँभाल सकते हैं। आँखें मलीं और सोचा कि कहीं नींद में तो नहीं हूँ क्योंकि ये बहुत बड़ी बात थी। मुझे इस बारे में संगत को भी बताना था। इस विचार से सोचने लगा कि कहीं गलती न कर बैठूं। क्योंकि उत्तराधिकारी का राज़ जानने के लिए संगत भी तड़प रही थी। उसके बाद फिर आँखें बंद की। फिर खोलकर देखा तो परम संत दर्शनसिंह जी, परम संत कृपालसिंह जी के सच्चे उत्तराधिकारी के रूप में नजर आये।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

सारे विश्व के प्रति विश्वास जताएगें। आप के यह भाव उन्हें बदल देगें। जब हम कोई कुत्ता, बिल्ली या अन्य जानवर पालते है तो उनका विश्वास केसे जीतते हैं। उन्हें समय पर भोजन अपने हाथ से कराते हैं। अगर आप आपने पालतू जानवरो के भोजन का ध्यान रखते हैं तो वह आप पर विश्वास करने लगते हैं। जो आप के नजदीकी लोग हैं, जिन्हें आप प्यार करते हैं, जिन्हें आप नजदीक रखना चाहते हैं, भोजन उनके साथ बैठ कर खाएं। उनके सुख दुःख का ध्यान रखें। जिन लोगों से आप का वास्ता है उन में से किसी का पैसा नहीं मारना, जिसका जो हक है, उसे दे देवें। जो लोग आप पर

### दिमाग की शक्ती

निर्भर हैं, चाहे वह कितना भी विपरीत हो, कितनी भी बड़ी गलती कर दें, भूल कर दें, उनका आर्थिक नुकसान नहीं करना। उन्हें रोजी रोटी से वंचित नहीं करना। किसी को मारना पीटना नहीं हैं। उन्हें पुस्तकें पढ़ने की सजा दो। उन्हें सत्संग में जाने की सजा दो। उन्हें प्रेरणात्मक विडियो या अडियो सुनने की सजा दें। कुछ लोग हमारे विश्वास पात्र होते हैं। जिन लोगों को आप लीड कर रहे हैं और वह आप का विरोध करते हैं, आप के विचारों से सहमत नहीं होते हैं, ऐसे लोगों के प्रति भी यह सोचें कि यह सब मेरे अमुक विश्वासपात्र की तरह भरोसेमंद बन जाएगें। आप की यह सोच उन्हें बदल देगी। नियम यह कहता है कि जिन के प्रति आप विश्वास रखते हैं वे सचमुच में बदल जाएगें। थोड़ा समय लगेगा।

परिवार, संस्था या आफिस के लोगों पर विश्वास किया करो, वह ठीक कार्य करेंगे। विश्वास करने का मतलब विषैले सम्बन्धों के प्रति अंधा होना या किसी को खुद से फायदा उठाने नहीं देना। कई बार परिवार के लोग या घनिष्ट मित्र भी विश्वास करने योग्य नहीं होंगे।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# साहित्य सहवास - 'देऊन-घेऊन'

एकदाच मिळणारं हे अमूल्य मनुष्य जीवन आहे. जे एकदाच मिळणारं असतं, त्याचा उपयोग अत्यंत विचारपूर्वक करावयाचा असतो. ह्या जीवनात योग्य विचार करणार नसाल, चांगलं वागणार- बोलणार नसाल तर काय उपयोग. वाईट मार्गावर चालणार असाल तर नक्कीच चांगल्याचं अमूल्यत्व समजण्याची गरज आहे. चांगल्या आजार, विचाराने जे कमावतो, ते एकट्याचं नाही, ह्यात अनेकांच योगदान नक्कीच आहे, हे अगदी मनापासून स्वीकारलंच पाहिजे. 'माणूस' म्हणून जन्माला आलो आहोत तर 'म णूस' म्हणून एकमेकांकडं पाहात, आपली कर्तव्ये, जबाबदाऱ्या पार पाडल्याच पाहिजेत. देण्यासारखं सुख कशातच नाही. दिल्यामुळं मिळणारं समाधान, आनंद शब्दातीत असतो. फक्त घेत राहाणं योग्य नाही. समजा, दिवसभर काम करुन एखाद्या व्यक्तीने पाचशे रुपये कमावले. कौटुंबिक खर्च भागावुन जर पन्नास रुपये शिल्लक राहात असतील, तर त्यातले पाच रुपये, गरजवंतास द्यावेतंच. त्यावेळी त्याने हा विचार करु नये की दिवसभर कष्ट करुन मी हे पैसे कमावले आहेत. स्वकष्टाचे पाच रुपये दान केल्यानंतर मनाला मिळणारी प्रसन्नता चांगलं काही सांगणारी असते. पैश्यांमागे प्रचंड वेगाने धावणाऱ्या व्यक्ती, घेणेकरी वर्गात मोडणाऱ्या आहेत. बँक पासबुकची क्रेडिट साईड अधिकाधिक वाढावी ह्याकरिता, ह्या घेणेकरी व्यक्ती, रक्तनात्याच्या व्यक्तींचा विचार करंत नाहीत. एवढंच नव्हे तर स्वतःच्या आरोग्याचाही विचार करत नाहीत.

धावावं जरुर, पण कुठं थांबायचं हेसुध्दा लक्षात आलं पाहिजे, थांबलंच पाहिजे. देणं आणि घेणं हा मनुष्य जीवनातला अविभाज्य भाग आहे. वार्षिक परिक्षेचा पेपर सकाळी अकरा वाजता आहे. दुपारी बारा वाजता पेपरला गेलं तर चालेल का ? अभ्यास करुन परिक्षेत उत्तीर्ण होण्याची संधी त्याविशिष्ठ दिलेल्या तासांमध्येच आहे. म्हणजेच उत्तरपत्रिकेत, योग्य उत्तर लिहिण्याची संधी, त्या मिळालेल्या विशिष्ठ तासांमध्येच आहे. तो निश्चित कालावधी अमूल्य आहे. आपली प्रगती होणार की अधोगती हे उत्तरं लिहिण्यावरुन ठरणार आहे. वेळेविषयी बोलत आहोत. घड्याळाने आपल्याला चोवीस तास दिलेत. हे चोवीस तास देतांना पुरुष, महिला, गरिब, श्रीमंत हा भेदभाव केलाच नाही. मिळालेल्या चोवीस तासांचा, अत्यंत योग्य उपयोग प्रगतीकडे वाटचाल करणारा असणार आहे. चोवीस तासांचा उपयोग योग्य प्रकारे करणार नसाल, तर अधोगती ठरलेली आहे. प्रत्येक मिनीटाचा उपयोग, कसा करतो ह्यावरुन भविष्य उज्वल होणार अथवा नाही हे निश्चित होतं. सेकंद काट्यासारखं योग्य गतीनं, योग्य दिशेनं, ध्येयाकडे वाटचाल अत्यंत महत्वाची आहेच. कारण एकदा गेलेली वेळ पुन्हा येत नाही.

शेजारी - शेजारी राहणाऱ्या दोन तरुण मुलांच्या वडिलांनी, आपापल्या मुलाला, नवीन मोटारसायकल घेऊन दिली. दोघेही तरुण आनंदी झाले. एक तरुण काम करुन पैसे कमावतो. गाडीत पेट्रोल भरतो. दुसरा तरुण, वडिलांकडे पेट्रोल भरण्यासाठी पैसे मागतो. वडिल नवीन गाडीची चावी, मुलाकडून, स्वतःकडे घेतात. म्हणतात, तुला नवीन मोटारसायकल घेऊन दिली. वाटलं होतं तू काम करुन, पैसे कमवुन, नवीन गाडीत पेट्रोल भरशील. तू तसं केलं नाहीस. शेजारच्या तुझ्या मित्राचा आदर्श घे. एक कायमचं लक्षात ठेव परमेश्वर, निसर्ग, एखादी व्यक्ती अथवा व्यक्तीसमुह, तुम्हाला देऊन पाहातो, तुम्ही नेमका कसा उपयोग करता आणि तुमच्याकडुन घेऊनही पाहतात, तुम्ही नेमकं कसं वागता-बोलता? तरुणाला चुक लक्षात आली. दुसऱ्या दिवसापासून तो कामाला जाऊ लागला. सोशल मिडियाच्या आजच्या ह्या काळात तुम्हाला एखाद्या व्हॉटस्अप ग्रुपमध्ये घेतलं. परंतु तुम्ही कोणतेही मेसेजस, ऑडिओज, व्हिडिओज त्या ग्रुपवर पाठवणं चुकीचं आहे. सदर ग्रुपमध्ये घेऊन ॲडमिनने तुम्हाला एक संधी दिली आहे. त्या संधीचं सोनं करणं सर्वस्वी तुमच्याच हातात आहे. अविचाराने वागलो की आपण, स्वतःचं नुकसान करुन घेतोच. एखाद्या गरजवंतासाठी, आपल्याजवळचा पैसा, तर कधी वेळ, तर कधी श्रम देऊ शकतो. देऊन घेऊनंच आपण एकमेकांसाठी चांगलं असं करु शकतो. जेव्हा चार व्यक्ती चांगल्या हेतूने एकत्र येतात, तेव्हा नक्कीच चांगलं घडतं. ते समाज, हिताचं असतं... घेता-घेता देणाऱ्याचे हातही घ्यावेत. ह्या वाक्यामुळं देऊन घेऊनचा अर्थ कळतो.

(लेख क्र.५३१)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

गर्भावस्थेमध्ये गर्भवती पाहिजे. आजार झाल्यावर रसायन कल्पांद्वारे शरीरामध्ये गर्भवती स्त्रीने शक्यतो आजारी पडू नये म्हणून विशेषत: काळजी घेतली. आजार झाल्यावर तो बरा करण्यापेक्षा आजारी पडू नये यासाठी विशेषतः आयुर्वेदिक लांटारे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवावी या उद्देशाने आयुर्वेदामध्ये चरकाचार्यांनी याविषयी ग्रंथात माहिती दिली आहे.

व्याधिं श्वास्था मृदु-मन शिशिर

सुखसुकुमारप्रायैः औषधोपचारैः उपचरेत्।

ती स्त्रीने आजारीच पडू नये व आजार झालाच

### गर्भावस्थेतील आजार व उपचार

तर वापरावयाची औषधे ही मधुर, रसात्मक, शीतवीर्य असलेली, आपल्याला घरामध्ये सहज उपलब्ध होतील अशी असावीत.

गर्भवती स्त्रीने घेतलेले कोणतेही औषध रसरक्ताद्वारे केवळ एक तासामध्येच गर्भापर्यंत पोहोचते. गर्भावस्थेच्या पहिल्या तीन महिन्यात गर्भाचे अवयव तयार होत असतात. या काळात गर्भाच्या शारीरिक व मानसिक विकासाला घातक ठरणारे औषधीघटक जर गर्भाशयात पोहोचले, तर गर्भाची हानी होते. काही बाळांमध्ये जन्म झाल्यावर त्यांच्या अवयवांमध्ये विकृती आढळतात किंवा काही बालके मतिमंद आढळतात. याला कारण म्हणजे गर्भावस्थेमध्ये मातेने घेतलेला चुकीचा आहार, विहार व औषधे असतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# RcadExpress Architectural

Plugin Software हे एक अत्याधुनिक, कार्यक्षम आणि वापरण्यास सोपे CAD प्लग–इन सॉफ्टवेअर आहे, जे मुख्यतः आर्किटेक्चरल डिझाइन आणि ड्राफ्टिंगसाठी विकसित केले गेले आहे. हे सॉफ्टवेअर डिझायनर्स, आर्किटेक्ट्स, इंटीरियर्स डिझायनर्स, कंत्राटदार,

विद्यार्थी आणि इतर डिझायनिंग व्यावसायिकांसाठी उपयुक्त आहे. याच्या मदतीने, आर्किटेक्चरल डिझाइन प्रक्रियेत गती, अचूकता आणि गुणवत्तेची वाढ होऊ शकते, तसेच वेळेची बचत देखील होते.


RcadExpress Architectural सॉफ्टवेअरचे विस्तृत स्पष्टीकरण:

**१. ऑटो रूम डायमेन्शन्स**

सॉफ्टवेअर प्रत्येक रूमच्या आकाराचे माप स्वयंचलितपणे तयार करते. रूमच्या लांबी, रुंदी आणि उंचीची माहिती मिळवून, सॉफ्टवेअर त्या मापांचा अचूकपणे डिझाइनमध्ये समावेश करतो. या प्रकारे, रूम डिमेन्शन्स काढण्यात होणारी मानवी त्रुटी टाळता येते.

**२. मीटर ते फूट / फूट ते मीटर रूपांतरण**

RcadExpress Architectural सॉफ्टवेअरमध्ये एक महत्त्वाची सुविधा आहे जी मीटर ते फूट आणि फूट ते मीटर रूपांतरण करते. यामुळे तुम्ही विविध माप युनिट्समध्ये लवकर आणि अचूकतेने रूपांतरण करू शकता. उदाहरणार्थ, तुम्ही ५ मीटर ६०० मिमी असलेली रूम असू शकते आणि त्याचा फूट मध्ये रूपांतरण करणे आवश्यक असेल, ते स्वयंचलितपणे होईल.




**३. ऑटो बिल्डिंग एलिव्हेशन आणि सेक्शन्स जनरेट करणे**


बिल्डिंगचे एलिव्हेशन (उंचीचे दृश्य) आणि विभाग (सेक्शन्स) तयार करणे हा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यात पारंपरिक ड्राफ्टिंग पद्धतीमध्ये वेळ आणि मेहनत खूप लागते. RcadExpress Architectural मध्ये, तुमच्या डिझाइनच्या मदतीने हे सर्व स्वयंचलितपणे होईल. सॉफ्टवेअर आपोआप योग्य माप आणि सेक्शन डिटेल्स तयार करून तुम्हाला कार्यक्षमता आणि अचूकता देते.

**४. ऑटो डोअर आणि विंडो प्लेसिंग**

डोअर आणि विंडो स्वयंचलितपणे प्लेस करणे हे डिझाइन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. RcadExpress Architectural तुम्हाला डोअर आणि विंडोच्या ठिकाणी सहजपणे प्लेसमेंट करता येईल. तुम्ही निवडलेल्या डिझाइनच्या वॉल्सवर ही इन्क्लूड होतात, ज्यामुळे त्वरित कार्य पूर्ण होते.


**५. वर्किंग ड्रॉइंग एका क्लिकमध्ये**

कार्यात्मक ड्रॉइंग किंवा वर्किंग ड्रॉइंग तयार करणे एक जटिल कार्य होऊ शकते. तथापि, RcadExpress Architectural मध्ये एक वैशिष्ट्य आहे जे तुम्हाला एकाच क्लिकमध्ये हे ड्रॉइंग तयार करण्याची क्षमता देते. यामुळे वेळ आणि श्रमाची बचत होऊन, तुमच्या प्रोजेक्टची गुणवत्ता देखील राखली जाते.




**६. बिल्ट–अप एरिया कॅलक्युलेशन्स**

इमारतीच्या बिल्ट–अप एरिया मोजणे अत्यंत महत्त्वाचे आहे, जे आवश्यकतेनुसार तयार करण्यात येते. RcadExpress rchitectural स्वयंचलितपणे इमारतीचा एकूण बिल्ट–अप एरिया मोजतो. यामुळे तुम्हाला एक अचूक परिणाम मिळतो, आणि तुम्हाला अतिरिक्त गणना करण्याची आवश्यकता नसते.




**७. प्लॉट एरिया कॅलक्युलेशन्स**


प्लॉटच्या क्षेत्राचे मोजमाप सहजपणे आणि स्वयंचलितपणे केले जाते. डिझायनर्स आणि कंत्राटदारांसाठी, योग्य माप घेणे आणि प्लॉटचे क्षेत्र निश्चित करणे हे महत्वाचे असते, जे सॉफ्टवेअरच्या सहाय्याने वेगाने आणि अचूकतेने साधता येते.

**८. फर्निचर लायब्ररी**

इंटीरियर्स डिझायनर्ससाठी फर्निचर लायब्ररी एक फायदेशीर वैशिष्ट्य आहे. या लायब्ररीमध्ये विविध प्रकारच्या फर्निचर आणि सजावट उपलब्ध असतात, ज्यामुळे इंटीरियर्स डिझाइन करताना वेळ वाचतो आणि कार्यक्षमता वाढते. यामुळे डिझायनर्सला हवे असलेले फर्निचर सहजपणे त्यांच्या डिझाइनमध्ये समाविष्ट करणे शक्य होते.

**९. इलेक्ट्रिकल लेआउट डिझाइन**

इमारतीचे इलेक्ट्रिकल लेआउट डिझाइन तयार करणे आणखी एक महत्त्वाचे कार्य आहे. सॉफ्टवेअर तुम्हाला स्वयंचलितपणे विविध इलेक्ट्रिकल उपकरणे, लाइट्स, सॉकेट्स आणि वायरिंगच्या लेआउट्स तयार करण्याची क्षमता देते. त्यामुळे वेळ वाचतो आणि डिझायनिंगचा अचूकतेवर फोकस केला जातो.



**१०. रेरा कॅलक्युलेशन्स आणि सबमिशन ड्रॉइंग**


सरकारी रिअल इस्टेट एजन्सीसाठी रेरा कॅल्क्युलेशन्स आणि सबमिशन ड्रॉइंग तयार करणे आवश्यक असते. RcadExpress Architectural या कॅलक्युलेशन्सला सहजतेने तयार करण्यासाठी उपयुक्त आहे, ज्यामुळे सरकारी कागदपत्रे आणि अनुमती प्रक्रिया जलद पार होऊ शकतात.

**११. सबमिशन ड्रॉइंग**

सरकारी कार्यालयांमध्ये किंवा कॉलेज प्रोजेक्ट्समध्ये सबमिशन ड्रॉइंग तयार करणे आवश्यक असते. सॉफ्टवेअर आपोआप ही ड्रॉइंग केली जातात.

**११. ऑटो सेंट्रलाइन**

CAD रेखाचित्रांमध्ये centerlines च्या निर्मितीची प्रक्रिया स्वयंचलित करते. यामुळे centerlines मॅन्युअली काढण्याची आवश्यकता संपते, ज्यामुळे प्रक्रिया जलद, अधिक अचूक आणि प्रभावी बनते. परिणामी, डिझाईनमध्ये सुसंगती राखली जाते आणि वेळ वाचतो.



RcadExpress Architectural **चा वापर कसा करावा?**

सॉफ्टवेअर वापरणे अत्यंत सोपे आहे. ते AutoCAD आणि इतर कुठल्याही CAD सॉफ्टवेअरशी सुसंगत आहे, त्यामुळे त्याचा उपयोग जगभरातील व्यावसायिक आणि विद्यार्थी करू शकतात. स्वयंचलित कमांड्सच्या सहाय्याने, कोणत्याही व्यक्तीला डिझायनिंगची प्रवीणता न असतानाही हे सॉफ्टवेअर वापरता येते.

**समारोप :**

RcadExpress Architectural हे प्लग–इन ARHCSTRUCT कंपनीने **रवींद्र माने** यांच्या नेतृत्वाखाली विकसित केले आहे. हे प्लग– इन आर्किटेक्चरल डिझायनर्स, स्ट्रक्चरल इंजिनियर्स आणि इतर संबंधित क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी विशेषतः CAD ड्राफ्टिंग सॉफ्टवेअर वापरणाऱ्यांसाठी डिझाइन केले आहे. हे सॉफ्टवेअर आर्किटेक्चरल डिझाइन आणि ड्राफ्टिंग कार्यांसाठी एक क्रांतिकारक साधन ठरते. यामुळे वेळेची बचत होते, अचूकता आणि गुणवत्ता सुनिश्चित केली जाते, आणि कामाच्या प्रत्येक टप्प्यावर कार्यक्षमता सुधारते सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थी किंवा पासआउट झालेला विद्यार्थी सुविधा प्रोवाइड करतात.

आपण **फ्री ट्रायल** www.rcadexpress.com या वेबसाइटवरून डाउनलोड करू शकता.

Installation किवा Training Support साठी काही मदत लागल्यास आपण ७३८५४७९७४७ या नंबरवर कॉल करू शकता.



ARCHSTRUCT
Ravi Mane
मोबा. ७३८५४७९७४७
rcadexpressgmail.com
ओम गृह निर्माण सोसायटी,
बोल्हेगाव रोड, एमआयडीसी,
अहिल्यानगर,४१४००१.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर AESA
www.aesanagar.com

## काटवन खंडोबा येथील दारु अड्ड्यावर छापा; गुन्हा दाखल

नगर – काटवन खंडोबा येथील संजय नगर, महात्मा फुले वसाहत येथे बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी मंगळवारी (दि. २४) छापा टाकला. या कारवाईत २४ हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारू जप्त करुन एकास ताब्यात घेतले. प्रकाश हेमू वाघमारे (वय ३८, रा. काटवन खंडोबा रोड, संजयनगर) असे पकडलेल्या व्यक्तीचे नाव असून या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी सुरज कदम यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई)प्रमाणे गुन्हाची नोंद केली. ही कारवाई पोलीस अंमलदार संदीप पितळे, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे, संकेत धिवर यांनी केली.

## जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत खो–खो खेळाचे प्रशिक्षण सुरू

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अधिनस्त क्रीडा व युवक सेवा पुणे विभाग अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगरच्या जिल्हा कीडा प्रशिक्षण केंद्राअंतर्गत खो–खो राज्य क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे हे १२ ते २५ वर्षे वयोगटातील शालेय, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नियमीत तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणार आहेत. हे प्रशिक्षण केंद्र १ जानेवारी २०२५ पासून सकाळी ६.०० ते ८:३० आणि सायंकाळी ५:०० ते ७:३० या वेळेत जिल्हा क्रीडा संकुल वाडियापार्क अहिल्यानगर येथील खो–खो मैदानावर सुरू करण्यात येत आहे. जिल्ह्यातील खेळाडूंनी प्रशिक्षण केंद्रात प्रवेश नोंदवावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी श्री. वाबळे यांना ७५८८१६९४९३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# शेतकरी ते ग्राहक थेट विक्री झाल्यास मालाला योग्य भाव व ग्राहकांना दर्जेदार माल मिळेल

### बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय खरेदीदार व विक्रेता संमेलन



कृषी विभाग आयोजित बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय खरेदीदार व विक्रेता संमेलनाचे दीपप्रज्ज्वलनाने उद्घाटन करताना 'स्मार्ट'चे प्रकल्प समन्वयक (पुणे) अरुण कांबळे. (छाया – समीर मन्यार)

नगर – शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठा कशाप्रकारे देता येतील. त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव कसा मिळेल, यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. शेती हा आपल्या जीवनाचा कणा आहे. ७८% शेतकरी शेती करतात. राज्याला पुढे न्यायचे असेल, तर शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. यासाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांची स्वतःची कंपनी असावी, यासाठी शासनाच्या माध्यमातून शेतकरी उत्पादक कंपनीची संकल्पना पुढे आली. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. शेतकरी ते ग्राहक थेट विक्री झाल्यास शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेल व चांगल्या दर्जाचा माल ग्राहकांना मिळेल. त्यासाठी खरेदीदार व विक्रेता यांनी एकत्र येण्याची गरज आहे. नव कृषी उद्योजकांना स्मार्ट प्रकल्पांतर्गत मोठ्या उद्योजकांत रूपांतर करण्यासाठी जिल्हास्तरीय खरेदीदार विक्रेता संमेलनाचे आयोजन केल्याचे प्रतिपादन 'स्मार्ट'चे प्रकल्प समन्वयक (पुणे) अरुण कांबळे यांनी केले.

कृषी विभाग आयोजित बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय खरेदीदार व विक्रेता संमेलनाचे उदघाटन श्री. कांबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी 'आत्मा'चे प्रकल्प संचालक, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप लाटे, नोडल अधिकारी राजाराम गायकवाड, प्रकल्प संचालक राजकुमार मोरे, मुल्यमापन तज्ज्ञ अधिकारी अश्विनी सपकाळ (पुणे), संदीप वर्पे, डीआरडीएचे सोम नाथ जगताप, वखार महामंडळाचे एन. आर. विरमनी, संजय गर्जे, मनीषा कौटे, विविध कंपन्यांचे खरेदीदार व शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रास्ताविकात आत्माचे प्रकल्प संचालक प्रदीप लाटे म्हणाले की, खरेदीदार व विक्रेता यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, हा मूळ उद्देश या संमेलनामागचा आहे. विविध पिकांच्या कार्यक्षम मूल्य साखळ्या विकसित करण्यासाठी कृषी विभाग व जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने २०१९ मध्ये राज्यात स्मार्ट प्रकल्प सुरू करण्यात आला. याद्वारे स्पर्धात्मक मूल्य साखळ्यांचा विकास करून अल्पभूधारक शेतकरी व नवीन कृषी उद्योजकांना वाव देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे या प्रकल्पांतर्गत नगर जिल्ह्यात ३३ प्रकल्प कृषी विभागाचे व अन्य यंत्रणेचे ३० प्रकल्पमंजूर आहेत व त्यांचे काम सुरू आहे. गटशेती केल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन वाढेल. ग्राहकांनाही दर्जेदार उत्पादन उपलब्ध होईल, असे ते म्हणाले.

यावेळी 'आत्मा'चे उपसंचालक राजाराम गायकवाड यांनी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प याबद्दल सविस्तर माहिती दिली. अश्विनी सपकाळ, गर्जे सर, सोमनाथ जगताप, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे मालक व शेतकरी व ग्राहकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणेश आहेर, राजू रोरे, नितीन रोकडे, मुजफ्फर पटेल यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजू रोरे यांनी केले. यावेळी खरेदीदारांसोबत सुमारे ८ ते १० सामंजस्य करार करण्यात आले.



अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्था दिनदर्शिकेचे करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# दिनदर्शिकेच्या माध्यमातून सभासदांना लेखाजोखा सादर

### अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्था दिनदर्शिकेचे प्रकाशन

नगर – मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेने सालाबाद प्रमाणे २०२५ या वर्षाचे दिनदर्शिका तयार केली असून, सभासदांना याद्वारे संचालक मंडळांनी वर्षभरात केलेल्या कामकाजाची माहिती देत लेखाजोखा सादर केला जातो. यामुळे पारदर्शकता येत असून एकमेकांमध्ये विश्वास संपादन केला जात असतो. दिनदर्शिकेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला आपल्या कामाचे नियोजन करता येत असते. याचबरोबर महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी, सण, उत्सव धार्मिकतेची माहिती सभासदांना व्हावी, यासाठी दरवर्षी दिनदर्शिका घरपोच दिली जाते, असे प्रतिपादन चेअरमन बलराज गायकवाड यांनी केले.

अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्था २०२५ वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन चेअरमन बलराज गायकवाड, व्हाईस चेअरमन बाळासाहेब गंगेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सतीश ताठे, शेखर देशपांडे, विकास गीते, अजय कांबळे, किशोर कानडे, गुलाब गाडे, सोमनाथ सोनवणे, कैलास चावरे, विजय कोतकर, संचलिका प्रमिला पवार, उषा वैराळ, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते

अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे २०२५ वर्षाची दिनदर्शिका नक्कीच सभासदांना आवडेल. याचबरोबर पतसंस्थेतील कारभाराची माहिती दिली असल्याची माहिती व्हाईस चेअरमन बाळासाहेब गंगेकर यांनी दिली.



## इंटरनॅशनल सिध्दाश्रम शक्ती सेंटर लंडनचे प्रमुख राज राजेश्वर गुरुजी यांचा मुंबई मध्ये गौरव

मुंबईमध्ये आयोजित पुरस्कार समारंभामध्ये ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंड कडून इंटरनॅशनल सिध्दाश्रम शक्ती सेंटर लंडन चे प्रमुख राज राजेश्वर गुरुजी यांचा ऑनर सर्टिफिकेट देऊन तारक मेहता का उलटा चष्मा मालिकेचे निर्माते असित मोदी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी तारक मेहता का उलटा चष्मा फेम अभिनेते दिलीप जोशी, ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंडचे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके व ग्लोबल बुक ऑफ एक्सलेन्स, इंग्लंड चे अध्यक्ष मनीष कुमार उपस्थित होते.

# सायकलिंगमधील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्काराने प्रताप जाधव सन्मानित

नवी दिल्ली – भारतामधील सायकलिंग क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या जीवन गौरव पुरस्काराने महाराष्ट्राच्या प्रताप जाधव यांना नवी दिल्ली येथे सन्मानीत करण्यात आले. येथे झालेल्या समारंभात एशियन सायकलिंग कॉन्फडरेशन (एसीसी) चे महासचिव ओंकार सिंग आणि हॉटेल व्यावसायीक आणि उद्योगपती गुरमीत सिंग यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतामध्ये सायकलिंग खेळासाठी २५ वर्षाहुन अधिक काळ प्रेरणादाया योगदान देणाऱ्या व्यक्तीस या पुरस्काराने गौरविण्यात येते.




प्रताप जाधव यांना सायकलिंगमधील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

प्रताप जाधव यांनी १९७७ ते १९८७ दरम्यान खेळाडू म्हणून आपली कारकिर्द गाजवली. यात राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सहा वेळा महाराष्ट्राचे प्रतिनीधीत्व केले. दोन वेळा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती कामगिरी केली. श्री. जाधव यांनी दोन वेळा राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. त्यांनी भारताममधील सर्वात जुन्या व खडतर समजल्या जाणाऱ्या मुंबई – पुणे सायकल स्पर्धेत सहा वेळी सहभाग घेतला असून रौप्यमहोत्सवी स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले आहे. १९९३ पासून राज्य तसेच राष्ट्रीय सायकलिंग संघटनेत विविध पदावर काम केले आहे. श्री. जाधव सध्या सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडीयाचे उपाध्यक्ष असून चार वर्षे ते सीएफआय चे खजिनदारही होते. संघटक म्हणून आपल्या ४० वर्षांच्या काळात प्रताप जाधव यांनी २३ वेळा मुंबई – पुणे सायकल स्पर्धा, १५ वेळा एमटीबी, ४ वेळा रोड आणि एकदा ट्रॅक अशा २० राष्ट्रीय सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा, १० वेळा राष्ट्रीय शालेय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले. भारतमध्ये चार दिवसीय स्टेज सायकल स्पर्धा सलग दोन वर्षे आयोजित केली तसेच सर्वात लांब पल्लयाची २५० किमी अंतराची कोल्हापूर – सातारा – कोल्हापूर एकदिवसीय सायकल स्पर्धा आयोजनाचा विक्रम आजही श्री. जाधव यांच्या नांवावर आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमीत्त पुणे ते बारामती राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन २००७ पासून त्यांनी केले आहे. प्रताप जाधव यांनी चार वर्षे महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएसन (एमओए) मध्ये संयुक्त सचिव म्हणून आपल्या कामाचा विशेष ठसा उमटवला. त्यांनी सुरु केलेल्या अनेक योजना आजही एमओए मध्ये यशस्वीरीत्या सुरु आहेत.

नवी दिल्ली येथे सीएफआयचे महासचिव मनिंदर पाल सिंग यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की प्रताप जाधव यांचे कार्य व नवनवीन योजना आमच्या सारख्या नवोदित संघटकांना नेहमी मार्गदर्शक ठरल्या आहेत. सायकलपटू केंद्रबिंदू ठेवून श्री. जाधव यांनी अनेक नवीन बदल आणि प्रस्ताव राज्य – राष्ट्रीय पातळीवर सुचवले आणि त्याची यशस्वी अंमलबजावणीही केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



सावेडीत होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी मनपाचे माजी सभागृह नेते किशोर डागवाले यांची नियुक्ती करण्यात आली. संयोजन समितीच्या वतीने त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## सावित्री-ज्योती महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी किशोर डागवाले

नगर - सावेडीत ९ ते १२ जानेवारी दरम्यान होणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी मनपाचे माजी सभागृह नेते किशोर डागवाले यांची नियुक्ती करण्यात आली. संयोजन समितीच्या वतीने त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सावित्री ज्योती संयोजन समितीचे प्रमुख संयोजक अ‍ॅड. महेश शिंदे, राजकुमार चिंतामणी, श्रीनिवास नागुल, विनोद साळवे, बाळासाहेब पाटोळे, आरती शिंदे, ब्युटीशियन सुमय्या शेख, अ‍ॅड. सुनील सूर्यवंशी, नितीन डागवले, प्रकाश डोमकावळे, समीक्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते.दरवर्षीप्रमाणे सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात जय युवा अ‍ॅकॅडमी, जिल्हा क्रीडा कार्यालय, महापालिका, नेहरू युवा केंद्र, जय असोसिएशन ऑफ एनजीओ (महाराष्ट्र राज्य), जिल्हा रुग्णालय, समाजकार्य महाविद्यालय, इंडो आयरीश हॉस्पिटल आदींच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या महोत्सवात बचत गट स्टॉल, वस्तू विक्री प्रदर्शन, बचत गटांच्या उत्पादनांचे विविध स्टॉल, सर्व जातीय वधू-वर मेळावा, वीर पत्नींचा गौरव, मुलगी वाचवा मुलगी शिकवा, मतदार जागृती अभियान, रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य शिबिर, लोककला सादरीकरण, युवक-युवतींसाठी विविध स्पर्धा, कवी संमेलन, व्याख्यान, ब्युटी टॅलेंट शो, लहान मुलांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा चार दिवस मेजवाणी राहणार आहे.

# स्नेहालयमधील सेवा संवर्धन कार्यशाळेचे उद्घाटन सत्र



स्नेहालय संस्थेने आयोजित केलेल्या निवासी सेवा संवर्धन कार्यशाळेचे उद्घाटन करताना शशिकांत सातभाई, मिलिंद कुलकर्णी आदी.

नगर - स्नेहालय संस्थेने आयोजित केलेल्या निवासी सेवा संवर्धन कार्यशाळेचे उद्घाटन झाले. हि कार्यशाळा पुढील तीन दिवस स्नेहालय संस्थेमध्ये सुरु असणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील ५० सामाजिक संस्थांचे संस्थापक सहभागी झाले असल्याचे कार्यशाळेचे निमंत्रक विश्वस्त शशिकांत सातभाई यांनी सांगितले.

संस्थेचे पालक मिलिंद कुलकर्णी यांनी स्वागत प्रसंगी सर्व समविचारी संस्था एकत्रित येऊन एक विचाराने काम करतील, तेव्हा अनेक सामाजिक कार्य उत्तमरीत्या पार पाडू शकतात. असे विचार व्यक्त केले.

विश्वस्त राजीव गुजर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी कार्याध्यक्ष अनिल गावडे आणि कार्यशाळेतील सहभागी संस्थांचे प्रमुख आदी उपस्थित होते. विशिष्ट सामाजिक उद्दिष्टांसाठी भारतात सर्वाधिक सामाजिक संस्था आणि संघटना महाराष्ट्रात स्थापन केल्या गेल्या. आजही महाराष्ट्र राज्य यात अग्रणीच आहे. तथापि विशेषतः नवोदित संस्थांना सेवाकार्याचे व्यवस्थापन, ध्येय उद्दिष्टांची स्पष्टता, संस्थेची मूल्यप्रणाली, बाह्य आणि अंतर्गत अनुपालन, कामाचे नियोजन, मानवी आणि आर्थिक संसाधनांचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा उपयोग, संस्थांतर्गत प्रक्रियांचे दृढीकरण, समाज माध्यमांचा वापर आणि प्रसिद्धी तंत्र, निधी संकलन आणि आर्थिक व्यवस्थापन, संघटन शास्त्र, विविध स्वरूपाच्या अधिस्वीकृती - अनुज्ञप्ती आणि परवाने यांची प्राप्ती, कामाची कायदेशीर चौकट इत्यादी विषयांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण आवश्यक असते. संस्था उभारणीपेक्षाही सामाजिक प्रश्नावरील मूलभूत आणि समन्वयीत काम स्नेहालयने नेहमीच महत्त्वाचे मानले. त्यामुळे आपल्यासारख्या असंख्य सामाजिक उपक्रमांची आणि संस्थांची उभारणी करण्यासाठी निरपेक्ष योगदान देणे हे स्नेहालयच्या कार्याचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

अनौपचारिक स्वरूपात असंख्य संस्थांना क्षमता विकासासाठी स्नेहालय गेली तीन दशके मदत करीत आले. तथापि या विषयावर सातत्यपूर्ण प्रशिक्षण सेवा संवर्धन कार्यशाळेच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे.कार्यशाळेत व्यवस्थापन तज्ज्ञ शशिकांत सातभाई, माध्यमतज्ज्ञ रीमा अमरापुरकर, बजाज फिन्सर्वचे निवृत्त सामाजिक दायित्व विभाग प्रमुख अजय साठे, सेवाकार्याचे अभ्यासक हर्षु घाटे, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे संचालक प्रा. डॉ. रमेश जारे आदी १४ तज्ञ संवादक सहभागी झाले आहेत. श्रीमती जया जोगदंड, अनिल गावडे, डॉ. प्रीती भोम्बे, संजय गुगळे, गीता कौर, हनीफ शेख, संजय चाबुकस्वार, अजित जगताप, विकास सुतार आदींनी या उपक्रमाचे संयोजन केले. यापुढे भविष्यात अशा ३ दिवसांच्या निवासी कार्यशाळा सातत्याने आयोजित केल्या जाणार असून प्रत्येक तुकडीत ५० संस्था प्रतिनिधींना प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती मिळाली.



जागतिक ध्यान दिनाचे औचित्य साधून हार्टफुलनेस अहमदनगर केंद्राच्या वतीने सावेडी जॉगिंग पार्क, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूल, अश्विन आयुर्वेद कॉलेज मांची संगमनेर, श्री बन्सीभाऊ म्हस्के विद्यालय मदडगाव, मार्कंडेय विद्यालय, सावेडी या ठिकाणी झालेल्या या शिबीरात सुमारे १००० महाविद्यालय युवक- युवती, विद्यार्थी, नागरिक यांना ध्यान प्रशिक्षण देण्यात आले (छाया - सुरेश मैड)

## जागतिक ध्यान दिवस, हार्टफुलनेस अहमदनगर केंद्रातर्फे ध्यान प्रशिक्षण शिबिरे


नगर - २१ डिसेंबर जागतिक ध्यानदिनाचे औचित्य साधून, वैश्विक मार्गदर्शक व पद्मभूषण सन्मानित कमलेश पटेल, हार्टफुलनेस (सहज मार्ग) यांच्या मार्गदर्शनाखाली, अहिल्यानगर केंद्राच्यावतीने नगर शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्यान प्रशिक्षण शिबिरे झाली. यामध्ये ध्यान, शिथिलीकरण यावर तज्ञ मार्गदर्शकांनी ध्यानाची, प्राणाहुती शक्ती द्वारे अनुभूती देऊन, ध्यानाचा अभ्यास केला, अशी माहिती केंद्राचे प्रमुख डॉ.ऋषिकेश उदमले यांनी दिली.

सावेडी जॉगिंग पार्क, रुपीबाई बोरा न्यू इंग्लिश स्कूल, अश्विन आयुर्वेद कॉलेज मांची संगमनेर, श्री बन्सीभाऊ म्हस्के विद्यालय मदडगाव, मार्कंडेय विद्यालय सावेडी या ठिकाणी झालेल्या या विविध शिबीरात सुमारे १००० महाविद्यालय युवक-युवती, विद्यार्थी, नागरिक यांना ध्यान प्रशिक्षण देण्यात आले. हार्टफुलनेस हे जागतिक स्तरावर १७० देशात ध्यान प्रशिक्षण देण्यासाठी कार्यरत आहे.

जागतिक ध्यान दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर केंद्राच्यावतीने आयोजित या विविध शिबिरात केंद्रप्रमुख डॉ. ऋषिकेश उदमले, डॉ. मंदार भणगे, अमोल आंदे, भरत आठरे, सौ. रीना खरमाळे, सौ. शुभांगी केंगे, विष्णू पालीवाल या प्रशिक्षकांनी ध्यानाचे प्रशिक्षण दिले.

या उपक्रमासाठी प्रशिक्षक डॉ. दत्ता गिरगे, सुनील वल्लाळ, डॉ.सौ. गिरगे या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तसेच सौ.मुक्ता मगर, श्री. खरमाळे, मैड सुरेश यांचे सहकार्य लाभले. हर्टफुलनेसच्या अहिल्यानगर केंद्राच्यावतीने दर रविवारी सकाळी ९ वाजता आयुर्वेद परिचय केंद्र, धन्वंतरी उद्यान, धर्माधिकारी मळ, प्रेमदान चौक या ठिकाणी सामूहिक ध्यानाचे आयोजन केले जाते. हार्टफुलनेस ध्यानाचा अनुभव आणि प्रशिक्षण घेण्यासाठी कुठलीही फी, मोबदला घेतला जात नाही. ही सेवा निःशुल्क आहे. इच्छुक नागरिकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## पवन नाईक यांची दूरदर्शन कला प्रस्तुती



नगर - येथील पवन श्रीकांत नाईक यांची सविस्तर मुलाखत व गायन होणार आहे. दूरदर्शन सह्याद्री वाहिनीच्या मैत्र हे शब्द सुरांचे या अंतर्गत सादरीकरण असून जाई काजळची ही प्रस्तुती आहे.

नाईक यांची ३५ वर्षांची सांगीतिक वाटचाल यात उलगडली जाईल. कुटूंब व लहानपण, संगीत गुरू परंपरा शास्त्रीय, सुगम, लोकसंगीत व सुफी संगीत प्रवास, बक्षीसे व पुरस्कार, कलाकार, गुरू, संगीत व संगीत समाजाची सेवा अशा व ईतर अनेक बाबींवर सविस्तर चर्चा तसेच त्याअनुषंगाने गायन असे कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

चित्रपट अभिनेते व ज्येष्ठ मुलाखतकार विघ्नेश जोशी यांनी मुलाखत घेतली असून उमा दिक्षीत या कार्यक्रम निर्माती आहेत. नाईक यांना ऋतुजा पाठक व नेहा दरवडे (संवादिनी), कुलदीप चव्हाण (बेंजो), शेखर दरवडे (तबला), मूलाशु परदेशी (सहगायन व सहवादन) तसेच नवरतन वर्मा, पवन तळेकर व श्रेयस शित्रे यांनी सहगायनाची साथ दिली आहे. यामध्ये ख्याल (राग - बिहाग), गवळण (संत नामदेव), गवळण (पठ्ठे बापूराव) व भारूड (संत एकनाथ), भक्तिगीत (ग दी माडगुळकर), भक्तीगीत (प्रा. निलेश खळीकर) व शबद (गुरूग्रंथसाहब - संत नामदेव) अशा सुंदर रचनांचे गायन होणार आहे.

मुलाखत सुसूत्रता व गाणी सुरेल, लयदार व तालात अचुक येण्यासाठी पवन नाईक यांचे संगीत गुरूजन सुरेश साळवी, मधुसूदन बोपर्डीकर, शुभलक्ष्मी गुणे, कुमुदिनी बोपर्डीकर, रेवन्नाथ भनगडे, शुभांगी मांडे, सतीश आचार्य, रघुनाथराव केसकर, वीणा कुलकर्णी, डॉ. शुभांगी बहुलीकर व डॉ. विकास कशाळकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

मैत्र हे शब्द सुरांचे हा कार्यक्रम २०२४ सालात एकदा व नवीन वर्ष २०२५ सालात दोन वेळा दाखविला जाणार आहे. कार्यक्रम सादरीकरणाचे दिवस व वेळा पुढीलप्रमाणे २९ डिसेंबर रात्री ८:३०, ५ जानेवारी सकाळी १० व सायंकाळी ५ वाजता असे एकूण तिन वेळा दाखवला जाणार आहे.

सर्व संगीत रसिकांनी दृकश्राव्यानंद घ्यावा, असे नम्र आवाहन पंकज नाईक व माधुरी नाईक यांनी केले आहे.



माउंट लिटेरा झी स्कूल, सारसनगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले.

## माउंट लिटेरा झी स्कूल, सारसनगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

नगर - शहरातील माउंट लिटेरा झी स्कूल सारसनगर यांनी आपल्या या वर्षीच्या स्नेहसंमेलनाची वयं विश्वं स्म: अर्थात आम्हीच आहोत सर्व जग ही मध्यवर्ती संकल्पना ठेवून स्नेहसंमेलन साजरा केला. शाळेतील विद्यार्थ्यांनी यावेळी उत्कृष्ट कलाविष्कार सादर करत नागरिकांचे व आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले, यामध्ये कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून करण्यात आली.

शाळेच्यावतीने स्वागत संस्थेच्या संचालिका सौ. स्वातीताई कानडे तसेच संस्थेचे विश्वस्त रामदास कानडे, मिलिंद कानडे व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. यास्मिन काझी मॅडम व पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. गगन वधवा मॅडम यांनी केले.

याप्रसंगी विविध देशाच्या व देशांतर्गत असलेल्या धार्मिक वेशभूषा करून पालकांनी सर्वधर्म एकात्मतेची शिकवण दिली.

विद्यार्थ्यांनी जगभरातील विविध नृत्याविष्कार करून उपस्थित सर्व दर्शकांना या विश्वाची एक दर्शनीय सांगीतिक नृत्यमय अशी सफर घडवून आणली या अनुषंगाने शेवटी आपला प्रिय भारत देश व आपल्या महाराष्ट्राच्या सफरीत छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेक्षकांच्यामधून ढोल ताशा तुताऱ्यांच्या निनादात घोड्यावरून झालेला प्रवेश हा परमोच्च क्षण ठरला. या संमेलनासाठी विशेष अतिथी म्हणून आमदार संग्राम जगताप, कवयित्री श्रीमती सरोज आल्हाट, भारतीय नागरी सेवा अधिकारी सौरभ देशमुख, उद्योगपती अण्णा चौधरी तसेच दिल्ली येथील झी लर्न MLZS च्या CSD श्रीमती शबनम मॅडम हजर होत्या. याशिवाय शाळेतील सर्व SMC मेंबर्स व PTA मेम्बर्सही सोहळ्यासाठी हजर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी मुख्याध्यापिका सौ. यास्मिन काझी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य केले.

# वकील वर्ग हा न्यायव्यवस्थेतील अविभाज्य भाग

### प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; कौटुंबिक न्यायालयाच्या बारच्या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे उत्साहात प्रकाशन



कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनच्या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे व कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश संगीता भालेराव.

नगर - कौटुंबिक न्यायालय हे अतिशय संवेदनशील न्यायालय आहे. नाती घट्ट करत संवेदना जिवंत ठेवणारे संवेदनशील न्यायाधीश, समुपदेशक व वकील येथे असल्याने एका कुटुंबाचेच द्योतक येथे आहेत. वकील वर्ग हा न्यायव्यवस्थेतील अविभाज्य भाग असल्याने त्यांच्या शिवाय न्यायालयीन काम होऊच शकत नाही. त्यामूळे वकिलांच्या ज्या समस्या व अडचणी आहेत त्या न्यायव्यवस्थेच्या अडचणी असल्याने त्या सोडवण्यास प्राधान्य देत गुण्यागोविंदाने काम करू. नगरचा बार गुण्यागोविंदाने कामकाजासाठी विख्यात आहे. कौटुंबिक न्यायालय बारचा दरवर्षी नव्या स्वरुपातील दिनदर्शिकेचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जुन्या न्यायालयातील कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनच्या सन २०२५ या नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते व कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश संगीता भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष सुरेश लगड, सचिव राजेश कावरे, अहमदनगर बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष राजेश कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके आदींसह पदाधिकारी व वकील उपस्थित होते.

यावेळी न्या.संगीता भालेराव म्हणल्या, कौटुंबिक न्यायालयात एखाद्या कुटुंबाप्रमाणे खेळीमेळीत कामकाज चालत असते. या न्यायालयात दरवर्षी दिनदर्शिका प्रसिद्ध करण्याचा शिरस्ता गेल्या ११ वर्षांपासून सुरु आहे. एक स्तुत्य हा उपक्रम आहे. ही केवळ दिनदर्शिका नसून गोड आठवणींचा साठा यामध्ये आहे. हा उपक्रम असाच अविरत चालू ठेवा. येणाऱ्या नव्या वर्षात सर्वांकडून चांगले काम घडो, या सदिच्छा.

प्रास्ताविकात लक्ष्मण कचरे म्हणाले, २०१३ सालापासून या न्यायालयात अखंडितपणे दरवर्षी दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. वकील, न्यायाधीशांना व कर्मचाऱ्यांनाही ही दिनदर्शिका उपयुक्त असते. झालेल्या उपक्रमाची माहितीही यात आहे.

माजी अध्यक्ष शिवाजीराव कराळे यांनी कौटुंबिक नायालायाचे कार्यक्षेत्र वाढण्याल्याने वकील, न्यायाधीश व कर्मचाऱ्यांवर कामाचा खूप ताण वाढला आहे. त्यामुळे या कोर्टासाठी अतिरिक्त न्यायाधीशाची मागणी बारने केली आहे. या मागणीकडे न्या.शेंडे यांचे लक्ष वेधून न्यायाधीश अंजू शेंडे या जिल्हाच्या पहिल्या महिला प्रधान व सत्र न्यायाधीश असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

सूत्रसंचालन सचिव राजेश कावरे व सहसचिव रोहिणी उंडे यांनी केले. यावेळी अहमदनगर बार असोसिएशनच्या सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. बारचे कार्यध्यक्ष शिवाजी सांगळे यांनी आभार मानले. यावेळी राजाभाऊ शिर्के, सचिन दरेकर, ज्ञानेश्वर दाते, सुजाता बोडखे, जयेश आमले, अजिंक्य काळे, कल्याण पागर, लॉयर्स असोसिएशनचे अध्यक्ष भूषण बऱ्हाटे आदींसह व वकील उपस्थित होते.

# वार्षिक स्नेहसंमेलनामुळे कलागुणांना वाव

### जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांचे प्रतिपादन; नालंदा स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



नगर-सोलापूर रोडवरील नालंदा स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन व पारितोषिक वितरण जिल्हा पोलीसप्रमुख राकेश ओला यांच्या हस्ते झाले. (छाया - समीर मन्यार)

नगर - प्रत्येक मुलाच्या अंगी कोणती ना कोणती कला दडलेली असते. स्टेज डेअरिंगसाठी वार्षिक स्नेहसंमेलन हे महत्त्वाचा घटक आहे. आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ यामुळे विद्यार्थ्यांना मिळते. त्यामुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, तसेच सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने वाटचाल अधिक सोपी होते. वार्षिक स्नेहसंमेलनामुळे मुलांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याने यामध्ये सहभागी होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीसप्रमुख राकेश ओला यांनी केले.

नगर-सोलापूर रोडवरील नालंदा स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. स्नेहसंमेलाचे उद्घाटन श्री. ओला यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी श्रेया ओला, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडुस, लेफ्ट. कर्नल यशवंत बहादुर्गे, संचालिका पल्लवी बहादुर्गे, गौतम बहादुर्गे, मुख्याध्यापिका हैदर डिसुजा आदींसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

लेफ्ट. कर्नल यशवंत बहादुर्गे म्हणाले की, टॉपर विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप सुरू करण्यात आली असून, सीबीएसई २०२३-२४ मध्ये दहावीच्या परीक्षेत ९८.६% गुण मिळविलेल्या यश पटवारी याला स्कॉलरशीप प्रदान करण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या अनेक शिष्यवृत्त्या नालंदा स्कूलमधील विद्यार्थ्यांना दिल्या जातात. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे ते म्हणाले. स्नेहसंमेलन हे वासुदेव कुटुंब कंभ या थिमपासून प्रेरित होता. यामध्ये ओरिसा सफर, विविध प्रकारची गाणी, स्क्रिप्टिंग, बाराहून अधिक देशांचे लोकनृत्य अशा प्रकारे काश्मीर ते कन्याकुमारी बरोबरच जगभराची सफर विद्यार्थ्यांनी याद्वारे उपस्थितांना घडवली. यामध्ये स्वतः विद्यार्थ्यांनी स्क्रिप्टिंग, सूत्रसंचालन, अँकरिंग, ऑडिओ व्हिज्युअल केले. उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

## नगरचे साहित्यिक त्र्यंबकराव देशमुख यांना दिपगंगा भागीरथी साहित्यरत्न पुरस्कार जाहीर



नगर - येथील साहित्यिक तथा समाजसेवक त्र्यंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांच्या साहित्य आणि समाजसेवाकार्याची दखल घेऊन त्यांना दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा दिपगंगा भागीरथी राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक दिपक लोंढे यांनी देशमुख यांच्या पुरस्काराची घोषणा केली.

केडगांव येथील टी. एस. उर्फ बाळासाहेब देशमुख यांनी स्वलिखित केलेल्या, श्री क्षेत्र मांडवगण आणि सिद्धेश्वर दर्शन, आबा मास्टर, द माऊंटन मॅन या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकांचा तथा त्यांच्या साहित्यसेवेच्या भरीव कामगिरीची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

शारदा वृद्धसेवाश्रम सांगली-कोल्हापूर आयोजित १८ जानेवारी शाहू स्मारक, दसरा चौक कोल्हापूर येथे पुरस्कार प्रदान सोहळ्यात, खासदार तथा कोल्हापूर संस्थानचे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज आणि समाजकल्याण पुणे विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांच्या हस्ते त्यांना सदर पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या कार्यक्रमास जीवन ज्योत कॅन्सर रिलीफ अ‍ॅण्ड केअर ट्रस्ट, मुंबईचे संस्थापक हरखचंद सावलासर, हृदय प्रकाशन कोल्हापूरचे प्रा. चंद्रकांत निकाडे, युवा व्याख्याते युवराज पाटील, लेखक, दिग्दर्शक अमर देवकर, समाजसेविका शारदा लोंढे, काव्यसम्राज्ञी संध्या भांगरे उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन दीपस्तंभ शैक्षणिक संस्था, कोल्हापूरचे संस्थापक देवसर यांनी केले आहे.

# निरामय

## मधुमेहाची प्राथमिक लक्षणे



भारतात मधुमेहींची संख्या झपाट्याने वाढत आहे. टाईप २ मधुमेह तरुणांपासून ज्येष्ठांना आपल्या विळख्यात घेत आहे. या व्याधीचं वेळेत निदान झालं तर पुढील गुंतागुंत टाळता येऊ शकते. टाईप २ मधुमेह हा सर्वसाधारणपणे आढळणारा प्रकार. यात शरीर इन्शुलिन या घटकाला प्रतिकार करू लागतं किंवा शरीरात इन्शुलिनची निर्मितीच होत नाही. इन्शुलिन हे शरीरातलं अत्यंत महत्त्वाचं हार्मोन असून त्याची निर्मिती स्वादुपिंडात होते. शरीराच्या चयापचय क्रियेच्या संतुलनात इन्शुलिन महत्त्वाची भूमिका बजावतं. यासोबतच रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्याचं कामही इन्शुलिन करतं. टाईप २ मधुमेहाची काही लक्षणं दिसून येतात. ही प्राथमिक लक्षणं वेळीच ओळखली तर मधुमेह नियंत्रणात राहू शकतो. कोणती आहेत की लक्षणं? जाणून घेऊ या.

व्याधी विचार

- मधुमेह जडल्यानंतर रक्तातली साखरेची पातळी वाढते. रक्तातली ही अतिरिक्त साखर काढून टाकण्याचा मूत्रपिंडांचा प्रयत्न असतो. ही साखर मूत्रावाटे बाहेर पडत असल्याने तुम्हाला वारंवार लघुशंकेला जावं लागतं. त्यातही रात्रीच्या वेळी हे प्रमाण वाढतं. हे टाईप २ मधुमेहाचं सुरूवातीचं लक्षण मानलं जातं.
- मूत्रावाटे पाणी बाहेर पडल्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. मूत्रपिंडांद्वारे शरीरातली अतिरिक्त साखर बाहेर पडल्यामुळे डिहायड्रेशनची समस्या जाणवते. यामुळे सतत तहान लागते. नेहमीपेक्षा अधिक तहान लागत असेल तर रक्ताची तपासणी करून घ्या.
- टाईप २ मधुमेहाचा शारीरिक ऊर्जेवर विपरित परिणाम होतो. पेशींना पुरेशा प्रमाणात ऊर्जा मिळत नसल्याने वारंवार थकवा जाणवतो. सतत दमल्यासारखं वाटत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- रक्तातली अतिरिक्त साखर डोळ्यांमधल्या अत्यंत छोट्या रक्तवाहिन्यांवर परिणाम करते. त्यामुळे अंधुक दिसू लागतं. अचानक अंधुक दिसू लागणं हे मधुमेहाचं लक्षण असू शकतं.
- मधुमेहाचा रक्ताभिसरणावर परिणाम होतो. यामुळे छोट्या जखमा बऱ्या व्हायला काही आठवडे किंवा महिने लागू शकतात. जखम लवकर बरी होत

# बाल्यावस्थेतील मासिक पाळी ही चिंताजनक समस्या

तारुण्य, ज्याला पौंगंडावस्था देखील म्हणतात, हा एक काळ असतो जेव्हा मुलांच्या शरीरात लैंगिक विकासाची प्रक्रिया सुरू होते. ही प्रक्रिया आठ ते १३ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये आणि नऊ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांम ध्ये आढळते. या काळात शारीरिक आणि मानसिक बदल होतात जसे की स्तनांचा विकास, चेहऱ्यावरील आणि जननेंद्रियाच्या केसांची वाढ आणि मुलींमध्ये मासिक पाळी सुरू होणे. तथापि, आता भारतीय समाजात एक नवीन आणि चिंताजनक समस्या उद्भवत आहे आणि ती म्हणजे लवकर यौवन किंवा अकाली यौवन म्हणजेच सहा वर्षांच्या मुलींमध्ये मासिक पाळी सुरू होणे.



लवकर तारुण्य ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे. त्यामुळे केवळ मुलांच्या आरोग्यालाच धोका नाही, तर त्याचे मानसिक, सामाजिक आणि भावनिक परिणामही खूप खोलवर होऊ शकतात. अशा परिस्थितीत ही समस्या का वाढत आहे, त्याची कारणे काय आहेत आणि ती थांबवण्यासाठी कोणती पावले उचलली जाऊ शकतात हे जाणून घेतले पाहिजे.

### तारुण्यकाळात शरीरात बदल घडतात

शरीराच्या अवयवांची वाढ, हार्मोनल बदल आणि लैंगिक वाढ. जेव्हा ही प्रक्रिया सामान्य वेळेपूर्वी सुरू होते, तेव्हा त्याला लवकर यौवन किंवा प्रिकोशियस प्युबर्टी म्हणतात.

साधारणपणे, मुलींमध्ये तारुण्य आठ ते १३ वर्षांच्या दरम्यान सुरू होते; परंतु काही प्रकरणांमध्ये ती वर्षांच्या वयातदेखील सुरू होऊ शकते. भारतात लवकर यौवनाची समस्या गेल्या काही वर्षांमध्ये वाढली आहे आणि आता ही मुले आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठी चिंतेची बाब बनली आहे. गेल्या काही वर्षांत मुलींमध्ये संक्रमणाचा कालावधी कमी झाला आहे. मुलींमध्ये शारीरिक बदलांची लक्षणे दिसल्यानंतर १८ महिने ते तीन वर्षांनंतर मासिक पाळी सुरू होते; पण आता शारीरिक बदलांची लक्षणे दिसू लागल्यावर त्यांची मासिक पाळी तीन ते चार महिन्यांमध्ये सुरू होते.

### लवकर वयात येण्यामागची कारणे

लवकर वयात येण्यामागे अनेक गुंतागुंतीची कारणे असू शकतात. या कारणांमध्ये जैविक, पर्यावरणीय, सामाजिक आणि शहरीकरणाशी संबंधित घटकांचा समावेश होतो.

### कीटकनाशके आणि रासायनिक प्रदूषण

कीटकनाशके आणि रासायनिक प्रदूषणामुळे मुलांच्या हार्मोनल प्रणालीवर परिणाम होऊ शकतो. वास्तविक, कीटकनाशकांमध्ये अशी रसायने असतात, जी शरीराच्या संप्रेरक प्रणालीमध्ये गोंधळ घालू शकतात. हार्मोनल असंतुलन उद्भवते आणि तारुण्य लवकर सुरू होऊ शकते.

### पोषण आणि आहार

पोषणाचा परिणाम मुलांच्या विकासावर खोलवर होतो. अलीकडच्या काळात मुलींमध्ये यौवनाचा काळ कमी झाला आहे. हे मुलांमधील वाढत्या वजन आणि लठ्ठपणाशी संबंधित असू शकते. जास्त चरबीयुक्त पदार्थ आणि उच्च-कॅलरी खाण्याच्या सवयींमुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. त्यामुळे हार्मोनल बदल होऊ शकतात. पॅकेज्ड फूड, प्रक्रिया केलेले पदार्थ, प्रिझर्व्हेटिव्ह्ज यांचा अतिवापर केल्यानेही शरीराच्या वाढीला गती येते. या रसायने आणि सिंथेटिक्समुळे हार्मोनल असंतुलन होऊ शकते. त्यामुळे तारुण्य सामान्यपेक्षा लवकर सुरू होते.

लक्षात घेऊ

### लठ्ठपणा

लठ्ठपणा, जी जागतिक आरोग्य समस्या बनली आहे, हे अकाली यौवनाचे मुख्य कारण आहे. लठ्ठपणा हा मुलांमध्ये लवकर यौवन होण्याचा सर्वात मोठा धोका घटक बनला आहे. कोविड-१९ महामारीच्या काळात ही समस्या वाढली आहे. जेव्हा मुले घरी जास्त वेळ घालवू लागली आणि शारीरिक हालचाली कमी झाल्या. लठ्ठपणामुळे, शरीरात अतिरिक्त चरबी जमा होते. त्यामुळे इस्ट्रोजेनसारख्या हार्मोन्सचे उत्पादन वाढते. परिणामी, मुलींना मासिक पाळी लवकर सुरू होऊ शकते, जी सहसा १० ते १३ वर्षांच्या दरम्यान होते.

### स्क्रीन टाइम आणि डिजिटल मीडिया

आजकाल मुले मोबाईल, टीव्ही आणि इतर डिजिटल उपकरणांवर जास्त वेळ घालवल्यामुळे ही समस्या वाढत आहे. मुलांमधील मानसिक आणि शारीरिक बदल जास्त स्क्रीन टाइम आणि डिजिटल मीडियाद्वारे वेगवान होऊ शकतात. ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया आणि इतर प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक सामग्रीचा मुलांच्या मानसिक विकासावर परिणाम होतो आणि परिणामी त्यांच्या शारीरिक विकासालाही गती मिळू शकते. यामुळे मानसिक आणि हार्मोनल असंतुलन होऊ शकते, त्यामुळे यौवनाची चिन्हे लवकर दिसू शकतात.

### कुटुंब आणि समाजाचा प्रभाव

भारतात मुलांच्या मानसिक स्थितीवर कुटुंब आणि समाजाचा मोठा प्रभाव असतो. कौटुंबिक तणाव, मानसिक दबाव आणि अनिश्चितता यांचा परिणाम मुलांच्या हार्मोनल विकासावर होतो. जेव्हा मुलांना कौटुंबिक समस्या किंवा सामाजिक ताणतणावांचा सामना करावा लागतो, तेव्हा त्यांच्या शरीरात हार्मोनल असंतुलन होऊ शकते. त्यामुळे लवकर यौवन होऊ शकते. याशिवाय, मुलांच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीवर त्यांच्या आजूबाजूच्या लोकांचाही परिणाम होतो. कुटुंबात जास्त वजन किंवा शारीरिक विकृती असल्यास मुलांनाही अशाच समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

# असोपेसियामुळे केस गळतात?

**चेहरा, त्वचेप्रमाणे केस हे सौंदर्याचे प्रतीक मानले जाते. केसांमुळे व्यक्तीचे सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व खुलून दिसते. तुमचे केस वेगाने आणि अतिप्रमाणात गळत असतील तर उपचार करायला हवेत.**



'लोपेसिया अरेटा' हा केसगळतीचा सर्वात सामान्य विकार आहे. अलोपेसिया म्हणजे टक्कल पडणे आणि अरेटा म्हणजे केस गळणे आणि हा आजार सामान्यतः सर्व वयोगटातील पुरुष आणि स्त्रियांमध्ये दिसून येतो. 'लोपेसिया अरेटा'मुळे टाळूवर आणि शरीराच्या इतर भागांवर केस लहान गोलाकार पॅचमध्ये गळतात. 'लोपेसिया अरेटा'एक 'ऑटोइम्यून'आजार आहे. यात शरीरातील रोगप्रतिकारकशक्ती आणि पांढऱ्या रक्ताच्या पेशी, ज्यांचे काम आजारांशी लढण्याचे असते. अशा पेशी 'हेयर फॉलिक्स'वर हल्ला करतात. त्यामुळे केस वेगाने गळायला सुरुवात होते. केस गळणे जसजसे वाढत जाते तसतसे पॅच एकमेकांना जोडतात आणि संपूर्ण टाळूवर टक्कल पडू लागते. हे केस सामान्यतः काही महिन्यांत पुन्हा वाढतात; परंतु उपचार न केल्यास अशा प्रकारचे केस पुन्हा गळतात. केसांची वाढ आणि केस गळतीचे चक्र हे वर्षानुवर्षे टिकू शकते.

'लोपेसिया अरेटा'ही वेदनादायक स्थिती नाही; परंतु एखाद्या व्यक्तीच्या जीवनावर आणि आत्मविश्वासावर परिणाम करते. त्यामुळे नैराश्य, चिंता आणि इतर भावनिक समस्या उद्भवतात. 'लोपेसिया अरेटा' वर कायमस्वरूपी इलाज नाही; पण तज्ज्ञांच्या सल्ल्याने त्याचे योग्य व्यवस्थापन करू शकतो. भविष्यात केस गळण्याची समस्या टाळू शकता. ही परिस्थिती तेव्हा उद्भवते, जेव्हा 'इम्यून सिस्टीम' चुकून 'हेयर फॉसिल्स'ना लक्ष्य करते. त्यामुळे केस गळतात. यामध्ये रोगप्रतिकारक प्रणाली केसांच्या मूळांवर हल्ला करते आणि त्यामुळे केस गळू लागतात आणि पातळ होतात.

'लोपेसिया अरेटा'कशामुळे?

■ कौटुंबिक इतिहास ■ मधुमेह ■ संधिवात ■ व्हायरल इन्फेक्शन ■ हार्मोनल बदल ■ आघात ■ भावनिक किंवा शारीरिक ताण

**'लोपेसिया अरेटा'ची लक्षणे**

टाळूवर पॅचेस पडणे. पापण्या, भुवया, दाढी, हात, पाय आणि शरीराच्या इतर भागांवरीलही केस गळतात. काही लोकांमध्ये, लक्षणे दिसण्यास विलंब होतो; परंतु काही प्रकरणांमध्ये, ते जलद आणि अपरिवर्तनीय असू शकतात. केस गळल्यानंतर सहसा पुन्हा वाढतात; परंतु पुन्हा वाढलेले केस हे एकसारखे नसतात आणि ते हलक्या रंगाचे असतात. असे देखील होऊ शकते की, जेव्हा एक पॅच पुन्हा वाढतो तेव्हा दुसरा पॅच तयार होऊ शकतो.

आरोग्यवेध

केस गळतीचे उपचार वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतात. जसे की सुरुवातीचे वय, केस गळण्याचे प्रमाण, नखांमधील बदल आणि इतर वैद्यकीय परिस्थिती. एक साधी 'ट्रायकोस्कोपी' आणि त्वचेची बायोप्सीदेखील तज्ज्ञांना केस गळण्याचे प्रकार आणि कारण अधिक चांगल्या प्रकारे निर्धारित करण्यात मदत करतात.

लोपेसिया अरेटाचे अनेक प्रकार आहेत. ते केस गळण्याच्या प्रमाणात वैशिष्ट्यीकृत आहेत आणि प्रत्येक प्रकारच्या केस गळतीचे उपचारदेखील भिन्न आहेत. *'लोपॅसिया रेटा' हा सर्वात सामान्य प्रकारचा अलोपेसिया आहे. ज्यात केस नाण्यांच्या आकाराच्या पॅचमध्ये पडतात.

■ टोटालिस : या प्रकारात तुमच्या डोक्यावरील केस पूर्णच गळतात.

युनिव्हर्सलिसः हा एक दुर्मिळ प्रकार आहे. यात डोके, चेहरा आणि शरीराच्या इतर भागातले केस पूर्णपणे गळतात.

■ डिफ्यूज अलोपेसिया एरियाटाः हे केस गळतीसारखेच दिसते, सामान्यतः कोणतेही पॅच नसतात आणि संपूर्ण टाळूवर केस पातळ होतात. ■ ओफियासिस अलोपेशियाः केस गळणे हे टाळूच्या मागील आणि खालच्या बाजूने होते.

भारतात केस पुन्हा वाढवण्याचे उपचार तुमचे वय, केस गळण्याचे ठिकाण आणि तुमचे केस गळण्याचे प्रमाण यावर अवलंबून असेल. जर 'लोपेसिया अरेटा' एक वर्षापेक्षा कमी कालावधीचा असेल तर तुमचे केस जास्त उपचार न करता वाढू शकतात.

**उपचार पर्याय:**

मिनोक्सिडिलः केसांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी ओव्हर-द-काउंटर मिनोऑक्सिडिल स्काल्पवर लावले जाऊ शकते.

**अँथ्रॅलिन** : हे औषध प्रभावित भागात लागू केले जाते आणि केस गळतीस कारणीभूत असलेल्या रोगप्रतिकारक प्रतिसादात बदल करतात असे मानले जाते.

**कॉर्टिकोस्टिरॉईडस** : टॉपिकल किंवा इंजेक्टेड कॉर्टिकोस्टिरॉईड्स प्रभावित भागात जळजळ कमी करू शकतात आणि केसांच्या वाढीस उत्तेजन देऊ शकतात.

# मोबाईलवर तास न तास घालवताय, 'ब्रेन रॉट'ची शिकार व्हाल!

मोबाईल फोन ही काळाची गरज आहे. या फोनवरून एका वेळी अनेक कामे शक्य झाली आहेत. इंटरनेट स्वस्तात उपलब्ध झाल्याने अनेक लोक सोशल मीडियावर तासन्तास घालवतात; पण फोन जास्त पाहणे आरोग्य आणि मानसिक संतुलनासाठी हानिकारक आहे. एका नवीन संशोधनात धक्कादायक गौप्यस्फोट करण्यात आला असून, फोन स्क्रीनमधून निघणाऱ्या हानिकारक किरणांचा आपल्या मेंदूवर वाईट परिणाम होतो. जास्त वेळ रील किंवा व्हिडीओ पाहण्याच्या सवयीमुळे शारीरिक नुकसान तर होतेच; पण मानसिक संतुलन बिघडण्यासही मदत होते.



'ब्रेन रॉट' या वैद्यकीय शब्दाची गेल्या काही दिवसांपासून आरोग्य विभागात चर्चा सुरू आहे. हे मेंदू आणि इंटरनेट तसेच फोनशी संबंधित आहे. याचा अर्थ असा आहे, की स्क्रीनचा दीर्घकाळ वापर केल्याने मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. 'ब्रेन रॉट' ही एक मानसिक स्थिती आहे, जिच्यात स्क्रीनशी जास्त वेळ जोडलेले राहिल्याने मेंदूवर नकारात्मक परिणाम होतो. यामुळे मानसिक थकवा, लक्ष न लागणे, स्मरणशक्ती कमी होणे आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. स्क्रीनवर जास्त वेळ घालवल्याने मेंदूचे कार्य मंदावते. त्यामुळे मानसिक क्षमता कमी होते.

संशोधन

**'ब्रेन रॉट'ची प्रमुख कारणे:**

■ फोनवर बराच वेळ राहणे ■ डिजिटल ओव्हरलोड म्हणजे सोशल मीडियावर जास्त वेळ घालवणे. ■ तुम्ही एकाच वेळी अनेक कामे करत असाल तर त्याचा मेंदूवरही परिणाम होतो, परिणामी मेंदूची फोकस पॉवर कमकुवत होते.

**'ब्रेन रॉट'ची लक्षणे:**

■ 'कॉग्निटिव एबिलिटी'- म्हणजे आपण लक्ष केंद्रित करणे किंवा सर्जनशीलता यासारखी मानसिक कार्ये करण्यास अक्षम आहात. ■ 'इमोशनल वीकनेस'- फोन स्क्रीनच्या जास्त संपर्कामुळे नैराश्य, एकटेपणा आणि चिंता या भावना येऊ शकतात. ■ 'प्रोफेशनल वर्क परफॉर्मन्स'- जे लोक फोनचा जास्त वापर करतात, त्यांची कामातील रुची कमी होते. कामातील निष्काळजीपणामुळे आपण आपले मन फोनमध्ये अधिक व्यस्त करतो.

**हे कसे रोखणार?**

■ फोन मर्यादित वापरा. ■ फोन व्यतिरिक्त, इतर क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करा. ■ मल्टीटास्किंग टाळा. ■ चांगल्या आणि सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करा.

## बहुगुणी आक्रोड



आक्रोड हा पोषणमूल्यांनी परिपूर्ण असा सुक्या मेव्यातला घटक आहे. यात प्रथिनं, आरोग्यदायी फॅट्स, खनिजं आणि जीवनसत्त्वं मुबलक प्रमाणात असतात. इतर सुक्या मेव्याच्या तुलनेत आक्रोडमध्ये अँटीऑक्सिडंट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. यातल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिड्समुळे हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं. आक्रोडात पॉलिफेनॉल हा घटक असतो. या घटकामुळे दाह कमी व्हायला मदत होते. यातल्या आरोग्यदायी फॅट्स, मॅग्नेशियम आणि फायबरमुळे रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो, रक्ताभिसरणही सुधारतं. आक्रोडातल्या पोषक घटकांमुळे उतारवयातही शरीराची शक्ती टिकून रहाते आणि आपण कार्यक्षम राहू शकतो.

आजीबाईचा बटवा


## टूथब्रशही स्वच्छ हवा

टूथब्रश पटकन हाती लागण्यासाठी आपण तो बेसिनजवळ किंवा बाथरूममध्ये ठेवतो. स्वच्छतेबाबत दक्ष असणारे काही जण ब्रश बेसिनवरच्या किंवा बाथरूममधल्या छोट्या कपाटात ठेवतात. दातांची काळजी घेत असताना टूथब्रशच्या स्वच्छतेचा आपण किती विचार करतो? वातावरणातले असंख्य जंतू या टूथब्रशवर बसत असतात. कपाटातलं कुंद वातावरण बॅक्टेरियांच्या वाढीला आमंत्रण देतं. त्यामुळे शक्यतो ब्रश मोकळ्या हवेत ठेवायला हवा. मधल्या काळात तो वाळायला हवा. म्हणूनच तो बंदिस्त कपाटात ठेऊ नये.



दंतारोग्य

# भारतात दर तासाला सर्पदंशाने सहा मृत्यू



भारतात दरवर्षी सरासरी ५८ हजार लोक साप चावल्यामुळे आपला जीव गमावतात. हा आकडा नक्कीच चिंताजनक आहे. जगभरातील मृत्यूंच्या आकडेवारीवर नजर टाकली, तर ऐंशी हजार ते एक लाख तीस हजार जण साप चावल्यामुळे मरण पावतात. त्यात भारताचा वाटा सर्वाधिक आहे. यामुळेच भारताला 'स्नेक बाईट कॅपिटल ऑफ वर्ल्ड' म्हटले जाते.

'इंडियन मिलियन डेथ स्टडी २०२०' नुसार, भारतात दर तासाला सुमारे ६ लोक साप चावल्यामुळे आपला जीव गमावतात. सर्पदंशाच्या घटनांबद्दल बोलायचे झाल्यास दरवर्षी ३० ते ४० लाख प्रकरणे नोंदवली जातात. सर्पदंशाच्या या वाढत्या घटना पाहता सरकारने सर्पदंशाचा समावेश 'नोटिफायेबल' आजाराच्या श्रेणीत केला आहे. ज्या रोगांमध्ये संसर्ग पसरण्याची उच्च शक्यता असते, ज्यांच्या परिणामी मृत्यू होतो किंवा योग्य उपचार शोधण्यासाठी लवकरात लवकर चाचणी करणे आवश्यक असते, अशा सर्व रोगांना सूचित करण्यायोग्य रोगांच्या यादीत समाविष्ट केले जाते.

बहुतेक राज्ये क्षयरोग, एचआयव्ही, कॉलरा, मलेरिया, डेंग्यू आणि हिपॅटायटीस यासारख्या संसर्गाकडे लक्ष देण्यास योग्य मानतात. साप चावताच त्याचा स्राव रक्तात मिसळू लागतो आणि संपूर्ण शरीरात पसरतो. हे आपल्या सर्वांना माहीत आहे. या काळात, नसा खराब होऊ लागतात. त्यामुळे हृदय आणि फुफ्फुसांना अर्धांगवायू होऊ शकतात. सर्पदंशावर वेळीच उपचार न केल्यास रुग्णाचा मृत्यूही होऊ शकतो. अशा परिस्थितीत सर्पदंशामुळे होणारा मृत्यू टाळण्यासाठी किंवा गंभीर शारीरिक समस्या उद्भवू नयेत, यासाठी रुग्णाला अँटीव्हेनम देण्याची गरज आहे.

काळजी घ्या

# पलंगावर बसून खाऊ नका

अनेकांच्या बेडरूममध्ये टिव्ही नसला तरी हातात स्मार्टफोन असतो. काहींना पलंगावर बसून खाण्याची सवय असते. ही सर्वसाधारण बाब वाटत असली तरी झोपण्याच्या पलंगावर बसून खाण्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पलंगावर बसून खाल्ल्यामुळे आपल्या झोपेवर परिणाम होतो. पलंगावर बसून खाणं, टिव्ही बघणं यासारख्या कृतींमुळे मेंदूला वेगळाच संदेश मिळतो. पलंग ही शांत झोपेची जागा नाही, असा त्याचा समज होतो आणि तुम्हाला शांत झोप लागत नाही. पलंगावर पडलेल्या अन्नकणांमुळे बॅक्टेरियांची संख्या झपाट्याने वाढू लागते. यामुळे तुमचा पलंग रोगांचं आगार बनून जातो. हे टाळण्यासाठी चादरी, उशांचे अभ्रे नियमितपणे बदलणं गरजेचं आहे. पलंगावर बसून स्मार्टफोनवर चित्रपट बघत खाल्ल्याने आपलं लक्ष विचलित होतं. खाताना सगळं लक्ष त्या एकाच कृतीकडे असायला हवं. लक्ष विचलित झाल्यामुळे अतिखाणं होतं. खाण्यावर आपलं नियंत्रणच रहात नाही. परिणामी, वजन वाढू लागतं. त्यामुळे डायनिंग टेबल किंवा जमिनीवर बसून खायला हवं.

आपण कुठे चुकतो?



# इरिटेबल मेल सिंड्रोमविषयी...

महिलांच्या शरीरात मासिक पाळीदरम्यान बरेच बदल होतात. त्यांच्या वागणुकीत चढउतार जाणवतात. कधी पटकन राग येतो, कधी रडू येतं, कधी भावनांना आवर घालणं कठीण होतं. अंगदुखी, पोटदुखी अशा शारीरिक समस्याही जाणवतात. याला 'प्रीमेन्स्ट्रूअल सिंड्रोम' (पीएमएस) असं म्हटलं जातं. मासिक पाळीच्या एक किंवा दोन आठवडे आधी अशी लक्षणं दिसून येतात. पुरुषांमध्ये मासिक पाळीसारखा कोणताही प्रकार नसला तरी महिन्यातले काही दिवस त्यांच्या वागणुकीत बदल झाल्याचं जाणवतं. 'प्रीमेन्स्ट्रूअल सिंड्रोम'सारखी काही लक्षणं पुरुषांमध्येही आढळतात. याला 'इरिटेबल मेल सिंड्रोम' (आयएमएस) असं म्हणतात. हार्मोन्समधल्या बदलांमुळे असं होतं. 'इरिटेबल मेल सिंड्रोम' हा शब्द फिजिओथेरेपिस्ट जेड डायमंड यांनी प्रचलित केला.

आयएमएस म्हणजे पुरुषांमध्ये आढळणारी अतिसंवेदनशीलता, नैराश्य, भीती, अस्वस्थता आणि राग यांसारखी लक्षणं. शरीरात होणारे जैवरासायनिक बदल, हार्मोन्सचं असंतुलन, ताण या बाबी याला कारणीभूत ठरतात. म्हणूनच महिन्यातले काही दिवस पुरुष चिडचिड करतात. कधी त्यांना निराश आणि हताश वाटतं. कधी ते चांगले असतात तर कधी पटकन रागवतात. पुरुषांच्या वागणुकीतल्या बदलांना अनेक घटक कारणीभूत ठरतात. मात्र टेस्टोस्टेरॉन हार्मोन्समधले बदल, चढउतार याला प्रामुख्याने कारणीभूत ठरतात. यासोबतच ताणाच्या पातळीत झालेले बदलही आयएमएसला कारणीभूत ठरू शकतात.

आरोग्य चर्चा

आहारातल्या सूक्ष्म बदलांमुळेही पुरुषांच्या वागणुकीत बदल होतात. जैवरासायनिक बदलही या व्याधीला जबाबदार ठरतात. पुरुषांचं वय वाढू लागल्यावर त्यांच्या शरीरातल्या टेस्टोस्टेरॉनच्या पातळीत घट होत जाते. यामुळेही त्यांच्या वर्तनात अमूलाग्र बदल होतात. पुरुषांच्या शरीरातल्या हार्मोनल बदलांचा कधीच विचार केला जात नाही. त्यामुळे पुरुषांच्या वागणुकीतल्या बदलांमागचं नेमकं कारण जाणून घेण्याचा प्रयत्नच होत नाही. पुरूषांचं चिडणं, हळवं होणं हे एखाद्या विकाराचं लक्षण असू शकतं, हे कोणाच्या लक्षातही येत नाही. यामुळे वर्षानुवर्ष हा प्रकार असाच सुरू रहातो. मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या शारीरिक बदलांचा पुरूषांनी सहानुभूतीने विचार करावा, असं महिलांना वाटत असतं. त्याचप्रमाणे आपल्या नात्यातल्या पुरूषांमध्ये असे काही बदल जाणवत असतील तर महिलांनी त्यांच्याशी बोलायला हवं. त्यांच्या भावभावना जाणून घ्यायला हव्यात. त्यांना वाटणारी काळजी आणि वागणुकीत होणाऱ्या बदलांचं नेमकं कारण जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. गरज लागली तर डॉक्टरांची, समुपदेशकांची मदत घ्यावी. हार्मोन्सचं संतुलन साधण्यासाठी जीवनशैलीत, आहारात अगदी साधेसोपे बदल करता येतात. औषधं बदलल्यामुळेही आराम मिळू शकतो. ताणतणावांपासून काही काळ दूर राहिल्यानेही सर्व काही नियंत्रणात येऊ शकतं.



# पोलीस केस मागे घेण्याकरिता तरुणीस जातीवाचक शिवीगाळ करत धमकावले

## आयुर्वेद हॉस्पिटलच्या पार्किंगमधील प्रकार, चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – पोलीस ठाण्यात दाखल केलेली अत्याचाराची केस मागे घेण्याकरिता एका १८ वर्षीय तरुणीला तिघांनी समक्ष तर एकाने फोनवरुन जातीवाचक शिवीगाळ करत धमकावल्याची घटना शहरातील आयुर्वेद हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये घडली.

याबाबतची माहिती अशी की, अरणगाव परिसरात राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणीने निखील सुनिल दळवी याचे विरुद्ध चार महिन्यापूर्वी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अत्याचार व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हा मागे घेण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जात आहे. २३ डिसेंबर रोजी सदर तरुणीचे वडिलांवर आयुर्वेद हॉस्पिटलम ध्ये उपचार सुरु असल्याने ती वडिलांच्या सुश्रुशेसाठी आयुर्वेद हॉस्पीटल येथे गेली होती. त्यावेळी तिला प्रसाद चौधरी (रा. अरणगाव गावठाण) याने हातवारे करुन आयुर्वेद हॉस्पीटलच्या पार्किंगमध्ये बोलावले. त्यावेळी ती तेथे गेली असता त्याठिकाणी प्रसाद चौधरी व त्याचे सोबत समीर सय्यद, वैभव दळवी हे तिघे उभे होते. त्यावेळी समीर सय्यद हा त्याच्या फोन वरुन निखील दळवी याच्या सोबत बोलत होता.

त्यावेळी प्रसाद चौधरी तिला म्हणाला की, तू निखील दळवी याच्यावर केलेली केस मागे घे, आम्ही त्याच्या सांगण्यावरुन तुला येथे घ्यायला आलो आहोत. त्यावेळी तिने त्यांना त्यांच्या सोबत जाण्यास नकार दिला. तेव्हा निखील दळवी हा समीर सय्यद याचा फोन स्पीकर वर असताना म्हणाला की, तु फक्त हा बोल मी तुला पळवुन घेवुन जाण्यासाठी येतो असा म्हणाला. त्यावर प्रसाद चौधरी हा म्हणाला की, तुझी सहमती असो अगर नसो आम्ही तुला घेवुन जाऊ. त्यास तिने नकार दिल्यावर दोघांनी तिला शिवीगाळ केली व म्हणाले की, तु जर आमच्या बरोबर आली नाही तर निखील फाशी घेईल. त्यासाठी तुला आमच्या बरोबर यावं लागेल. असे बोलून तिला जातीवाचक अपशब्द बोलून, धमकी देऊन ते तिघे तेथुन निघुन गेले.

सदर प्रकार या तरुणीने तिच्या वडिलांना हॉस्पिटल मधून घरी सोडल्यानंतर कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर शुक्रवारी (दि.२७) रात्री तिने कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली, या फिर्यादीवरून पोलिसांनी निखील दळवी, प्रसाद चौधरी, वैभव दळवी, समीर सय्यद, चौघांविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३५१ (२), ३५२, अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक ३ (१) (आर), ३ (१) (एस), ३ (२) (व्ही ए) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# शाळेत भरवला आनंदी बाजार; प्लॅस्टिक मुक्तीचा दिला संदेश

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणात आनंदी बाजार भरवला होता. या आनंदी बाजाराचे उद्घाटन समता परिषदेचे तालुकाध्यक्ष रामदास फुले यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने उत्साहाने आनंदी बाजाराचे आयोजन केले होते. भाजीपाला विकता विकता या बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी प्लॅस्टिक मुक्तीचा संदेश दिला व तो ग्रामस्थांना आवडला.



नेप्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणात भरवलेला आनंदी बाजार.

या आनंदी बाजारात फास्ट फूड, पावभाजी, पाणीपुरी, भजे, वडेपाव, पोहे, भेळ, लाडू, चिक्की, – पालक मेथी, शेवगा, वांगी बटाटे कांदे, मटकी, ओला हरभरा, मुग, डाळ, चणा डाळ, हरभरा डाळ शेवगा, कोबी फ्लॉवर, किराणा बाजार, चहा, कॉफी रसरशीत चिंचा आदीचे स्टॉल लावण्यात आले होते.

यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, सरपंच संजय जपकर, उपसरपंच दादू चौगुले, फारुक सय्यद,रामदास फुले, दिलीप होळकर, ग्रामपंचायत सदस्य संतोष चौरे, लक्ष्मण कांडेकर, मुख्याध्यापिका पदमा मांडगे, सुरेश कार्ले, प्रा. एकनाथ होले, आशा ढोले, नूतन पाटोळे, मीना काटमोरे, निर्मला कांडेकर, शिवांजली कांडेकर, राजश्री कोल्हे, मंदार लोकरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब होळकर, उपाध्यक्ष रोहिणी चौरे, दत्तात्रय कांडेकर, अमोल चौगुले, लहू फुले, भूषण पवार, राहुल गवारे, भीमराज जपकर, अर्जुन खामकर, अनिल पवार, गुलाब सय्यद, गणेश कांडेकर, दिनेश राऊत, रफिक सय्यद, पालक महिला, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शाळेने हा उपक्रम राबवल्याबद्दल केंद्रप्रमुख संजय धामणे, विस्ताराधिकारी निर्मला साठे, गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव यांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना आर्थिक देवाण–घेवाणीचे ज्ञान प्राप्त व्हावे तसेच व्यावसायिक दृष्टिकोन आत्मसात व्हावा यासाठी या बाजाराचे आयोजन करण्यात आले होते.

विविध वस्तू, खाद्यपदार्थ व भाजीपाला खरेदी करण्यासाठी पालक व ग्रामस्थांची झुंबड उडाली होती. पाच ते दहा रुपयात भाज्या मिळत असल्याने मिळत असल्याने ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर खरेदीचा उत्साह पहावयास मिळत होता.

# 'अरिहंत कॉलेज' च्या विद्यार्थिनींची महात्मा फुले कृषी विद्यापीठातील औषधी वनस्पती उद्यानाला भेट

नगर – अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीने १८ डिसेंबर रोजी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील औषधी वनस्पती उद्यानाला यशस्वी भेट दिली. या शैक्षणिक भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतींच्या महत्वाची सखोल माहिती मिळवून देणे आणि त्यांचा औषधनिर्मितीत होणारा वापर समजून घेणे होता.

औषधी वनस्पतींचा अभ्यास हा फार्मसी शिक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयाने ही शैक्षणिक भेट आयोजित केली. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना भेटीपूर्वी औषधी वनस्पतींच्या उपयोगांवर आधारित प्राथमिक माहिती दिली.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींनी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील औषधी वनस्पती उद्यानाला भेट दिली.

विद्यार्थ्यांना औषधी वनस्पती उद्यानातील १०० हून अधिक औषधी वनस्पतींच्या प्रकारांबद्दल माहिती मिळाली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध औषधी वनस्पती, त्यांची शास्त्रीय नावे, गुणधर्म, आणि औषधनिर्मितीतील उपयोग याबद्दल सविस्तर माहिती घेतली. विद्यापीठाच्या तज्ञ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि औषधी वनस्पतींच्या संवर्धनाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आणि अशा उपक्रमांमुळे त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले.

ही भेट यशस्वी करण्यात महाविद्यालयाचे डॉ. योगेश बाफना, प्रा. माधुरी पवार, प्रा.प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड, प्रा. शीतल खंडागळे, प्रा. रुचिता पवार व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे योगदान लाभले. अशा उपक्रमांद्वारे अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी शिक्षणासोबत व्यावहारिक ज्ञान देण्यावर भर देत आहे.

# इंग्लंडच्या ग्लोबल एक्सलन्स ॲवॉर्डने डॉक्टर ईशा अग्रवाल यांचा सन्मान

मुंबई – भारतीय संस्कृती आणि प्रतिभेचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करणाऱ्या डॉ. ईशा अग्रवाल यांना इंग्लंडच्या ग्लोबल एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. मुंबईत आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.



डॉ. ईशा अग्रवाल यांना इंग्लंडच्या ग्लोबल एक्सलन्स अवॉर्डने सन्मानित करताना जनरल कर्नल तुषार आदी.

डॉ. ईशा अग्रवाल यांना यूएसए (बाल्टिमोर), रशिया (मॉस्को), लाटव्हिया (युरोप) आणि थायलंडमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धांमध्ये मिळवलेल्या विजयानिमित्त या सन्मानाने गौरविण्यात आले.

हा सन्मान जनरल कर्नल तुषार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, ज्यामुळे या क्षणाचे महत्त्व अधिकच वाढले.

या सोहळ्यात तारक मेहता का उल्टा चष्मा या मालिकेतील 'जेठालाल' या भूमिकेसाठी प्रसिद्ध अभिनेते दिलीप जोशी यांचा देखील ४,००० भागांचा ऐतिहासिक टप्पा गाठल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

## सीए फायनल परीक्षा अनुज गांधी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण



नगर – येथील अनुज गांधी यांनी अथक परिश्रमामुळे सीए फायनल परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण केली. अनुज यांच्या यशामागे त्यांचे वडील सीए संजय गांधी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच आई बीना गांधी यांच्या प्रोत्साहनाचा हात आणि साहाय्य महत्त्वाचे ठरले. त्याचप्रमाणे, सीए रचना डुंगरवाल, सीए उमेश दोडेजा सर आणि सीए यश डागा सर यांचे मार्गदर्शन त्यांच्या यशात महत्त्वपूर्ण ठरले.

# जैन कॉन्फरन्सची निवडणूक महाराष्ट्र प्रांतातून सामंजस्यातून बिनविरोध

नगर – अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या २०२५-२०२७ कार्यकाळासाठी होणाऱ्या राष्ट्रीय निवडणुका ५ जानेवारी २०२५ रोजी भारतातील पाच झोन आणि तेरा प्रांतांमध्ये होणार होत्या. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी दिल्लीचे अतुल जैन यांची सर्वसंमतीने निवड झाल्याने राष्ट्रीय पातळीवर एक नवा आदर्श निर्माण झाला. या निवडणुका बिनविरोध होऊन सामंजस्याने पूर्ण व्हाव्यात आणि मतभेद, वाद टाळले जावेत, असा संकल्प कॉन्फरन्सच्या सर्व स्तरांवर करण्यात आला.

महाराष्ट्र प्रांताच्या चतुर्थ झोनमध्येही निवडणुकांऐवजी सामंजस्याने निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एक सकारात्मक पाऊल उचलण्यात आले. या प्रयत्नांचे नेतृत्व अशोक (बाबूशेठ) बोरा आणि संजय बाफना यांनी केले. त्यांना निवर्तमान राष्ट्रीय अध्यक्ष आनंदमल छल्लाणी, विश्वस्त अशोक मेहता, झोन–४ चे प्रांतीय युवा अध्यक्ष रोशन चोरडिया, धनेश कोठारी यांचे मार्गदर्शन व पाठिंबा लाभला.

सामंजस्याचा नवा आदर्शसंवाद, सहकार्य, आणि संघटनाला प्रोत्साहन देण्यासाठी २०–२० फॉर्म्युल्या अंतर्गत झोन–४ मध्ये बिनविरोध निवडीचा प्रस्ताव यशस्वीपणे पूर्ण झाला. या सामंजस्यामुळे महाराष्ट्र प्रांतातून देशभरात एकता, शांतता आणि सहकाराचा संदेश पोहोचला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील निवडलेले सदस्य झोन–४मध्ये ४० सदस्य निवडायचे होते. दोन्ही पॅनेलमधून ७४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातून बिनविरोध निवड झालेले सदस्य पुढीलप्रमाणे – ईश्वर बाबूशेठ बोरा, वसंत हस्तीमल लोढा, अनिल रायचंद कटारिया, विजय कुंतीलाल गुगळे, राजेंद्र बलदोटा, रोशन नरेंद्र चोरडिया, पवन पोपटलाल कटारिया, नीतिन सुभाष पटवा, संतोष फुलचंद गांधी, पियुष दिलीप लुंकड.

# महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व हरपले

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्थव्यवस्था सुदृढ झाली आहे.



डॉ. मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

१९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टन सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यान राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तीचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ. मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ. मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहितासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ. मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ. मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींना आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ. मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



रेल्वे स्टेशन भागातील जय मल्हार चौक परिसरातील संजीवनी कॉलनीतील चार सदस्यांनी रूफ टॉप सोलर पॅनल बसवून दरमहा सरासरी २००० युनिट वीज निर्मिती केली आहे. (छाया – लहू दळवी)

# संजीवनी कॉलनीची ग्रीन कॉलनीकडे वाटचाल

## महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; सौरऊर्जेतून दरमहा २००० युनिट वीजनिर्मिती

नगर – सौरऊर्जा ही अनंत, हरित, स्वच्छ व पर्यावरणास अनुकूल असून या ऊर्जेचा नागरिकांनी जास्तीत जास्त वापर करणे ही काळाची गरज आहे. सौरऊर्जेचे महत्व ओळखून रेल्वे स्टेशन भागातील जय मल्हार चौक परिसरातील संजीवनी कॉलनीतील चार सदस्यांनी रूफ टॉप सोलर पॅनल बसवून दरमहा सरासरी २००० युनिट वीज निर्मिती केली आहे. संजीवनी कॉलनीची ग्रीन कॉलनीकडे सुरू असलेली ही वाटचाल कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

संजीवनी कॉलनीतील अशोक चुडीवाल, चंद्रकांत शिपणकर, प्रशांत मते व सागर दुर्गुळे या चार सदस्यांनी घराच्या छतावर बसवलेल्या रूफ टॉप सोलर पॅनल युनिटची पाहणी आयुक्त डांगे यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते. कॉलनीतील सदस्यांकडे एक इलेक्ट्रिक फोर व्हीलर व नऊ इलेक्ट्रिक टू व्हीलर आहेत. तसेच नऊ सदस्यांकडे सोलर वॉटर हीटर आहेत. ही बाब देखील उल्लेखनीय व प्रशंसनीय असल्याचे यावेळी श्री. डांगे यांनी सांगितले. कॉलनीचा स्वच्छ व हरित परिसर पाहून आयुक्त डांगे यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी कॉलनीतील सदस्य श्रीकृष्ण लांडगे, राजेंद्र शिपणकर, सुनिल जोशी, चंद्रकांत शिपणकर, प्रशांत मते, राजेंद्र बळे, विरु नगरकर, अभय लवलाणी, पारस चुडीवाल, सागर दुर्गुळे, ऋषिकेश लवलाणी, आदिश चुडीवाल आदी उपस्थित होते.

# बेदरकारपणे रिक्षा चालवणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

नगर – शहरातील रस्त्यावरुन बेदरकारपणे व हयगयीने वाहन चालवणाऱ्या तीन रिक्षाचालकांवर कोतवाली पोलिसांनी कारवाई करुन त्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. माळीवाडा बसस्थानक परिसरातील इम्पिरियल चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या जवळ ही कारवाई करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की कोतवाली पोलिस अंमलदार विजय काळे, केकाण, महिला पोलिस अंमलदार श्वेता परमासागर हे शहर हद्दीत पेट्रोलिंग करत असताना इंपिरियल चौक येथील रोडवर युसूफ हसन पठाण (रा. मस्जिद जवळ, गजराजनगर), शेरु अब्दुल हाफिझ शेख (वय ३५, रा. सदर बाजार, भिंगार), शाहरुख असिर खान (वय २७, रा. आलमगीर मदरशाच्या पाठीमागे, नागरदेवळे) हे तिघे बेदरकारपणे व हयगयीने रिक्षा चालवीत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी महिला पोलिस अंमलदार श्वेता परमासागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन युसूफ पठाण, शेरु शेख, आणि शाहरुख खान यांचे विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २८१ प्रमाणे तीन वेगवेगळ्या गुन्ह्याची नोंद केली आहे. पुढील तपास पोलिस आमंलदार विजय काळे हे करीत आहेत.

